रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ ◆ अंक ३५०
www.ramprahar.com
सोमवार ७ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्जत रेल्वेस्थानकात धावत्या लोकलमधून महिलेची उडी/२
माथेरान घाटात थार गाडीचा अपघात; पर्यटक बचावले/५
जोकोविचचे विम्बल्डनमध्ये विजयांचे शतक/८

## राज्यात जोरदार पर्जन्यवृष्टीचा हवामान खात्याचा अंदाज



**पुणे :** समुद्रसपाटीवरील वाऱ्याची द्रोणीय रेषा दक्षिण गुजरात ते कर्नाटक किनारपट्टीपर्यंत आहे. त्यामुळे कोकण गोव्यासह मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात दोन दिवस पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. कोकणात ठाणे, पालघर व रत्नागिरीमधील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडणार असून वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ४५ किमी असणार आहे. मध्य महाराष्ट्रात नाशिक, कोल्हापूर आणि साताऱ्याच्या घाट परिसरात दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, तर पुढील दोन दिवस पुण्याच्या घाट परिसरात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार आणि तुरळक ठिकाणी २० सेमीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुण्याच्या घाट परिसराला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

# बा विठ्ठला, बळीराजाला सुखी ठेव!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे साकडे | आषाढी एकादशीनिमित्त सपत्नीक महापूजा

**पंढरपूर : प्रतिनिधी**

पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. ६) घातले. आषाढी शुद्ध एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी कैलास दामु उगले, कल्पना कैलास उगले (मु.पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक) यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.



या समारंभास पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्र्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, बाबासाहेब देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, संजय सावकारे, देवेंद्र कोठे, अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि या वर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच, परंतु पायी चालतही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली.

वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे, असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारीसोबत हरित, पर्यावरणपूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.



### श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार वितरण

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक १३ जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा; द्वितीय श्री बाळकृष्णबुवा वारकरी दिंडी क्रमांक १९ श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आणि तृतीय क्रमांक श्री गुरू बाळासाहेब आजरेकर दिंडी क्रमांक २३ श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा यांनी प्राप्त केला. या सर्वांना सन्मानित करण्यात आले.

### करंजा बंदरातील मच्छीमारांची फसवणूक प्रकरण

# फरार आरोपींचे जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळले

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील करंजा बंदरातील मच्छीमारांची कोट्यवधींची मासळी खरेदी करून पैसे न देता फसवणूक करणाऱ्या दलाल, व्यापारी, निर्यातदारांचा जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. त्यामुळे फरार असलेल्या या आरोपींना अटक करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबईतील ससून डॉक बंदरातील वाढता ताण कमी करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील करंजा येथे सुमारे २५० कोटी रुपये खर्चून मच्छीमारांसाठी अद्यावत बंदर उभारण्यात आले आहे. नव्याने उभारण्यात आलेले बंदर मासळी निर्यातीसाठी रायगड जिल्ह्यासह स्थानिक हजारो मच्छीमारांना सोयीचे आणि फायदेशीर ठरले आहे. त्यामुळे या बंदरातून काही महिन्यांतच सुमारे ६०० कोटींहून अधिक रुपयांच्या मासळी निर्यात करण्यात आली आहे.

करंजा बंदरात काही मच्छी व्यापारी, दलालांना हाताशी धरून काही नव्या निर्यातदार कंपन्या, व्यापाऱ्यांनी बंदरातून मासळी खरेदी करण्यास सुरुवात केली होती. सुरुवातीला निर्यातदार कंपन्या, व्यापाऱ्यांनी स्थानिक



मच्छीमारांना मालाचे पैसे देऊन विश्वास संपादन केला, मात्र त्यानंतर खरेदी केलेल्या मासळीचे पैसे देण्यास दलाल, व्यापारी टाळाटाळ करू लागले.

मच्छीमारांचे कोट्यवधींची थकीत रक्कम अदा न करताच निर्यातदार कंपन्या, व्यापाऱ्यांनी पळ काढला होता. स्थानिक मच्छीमारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, रमेश नाखवा, विघ्नेश कोळी आदींनी फसवणूक करणाऱ्या दलाल, व्यापारी, निर्यातदारांविरोधात उरण पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत.

राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनीही मच्छीमारांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यापासूनच शोएब फारुख शेख, प्रशांत शेवाळे, दिनकर भेदाते, अनंत पाटील, विक्रम भेदाते, शहजाद अन्सारी हे आरोपी फरार झाले आहेत. आरोपींनी जिल्हा सत्र न्यायालयात जामिनासाठी केलेले अर्ज शनिवारी फेटाळून लावण्यात आले. त्यामुळे त्यांच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, स्थानिक मच्छीमारांनी एकजूट होऊन यापुढे तस्कर टोळ्यांकडून आपली फसवणूक होणार नाही यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी केले आहे.



## निवडक

### 'रॉयटर्स'च्या एक्स हँडल ब्लॉकसंदर्भात सरकारचे निवेदन

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था रॉयटर्सचे अधिकृत एक्स हँडल भारतात ब्लॉक झाल्याची चर्चा होती. यावर भारत सरकारने निवेदन जारी करून, आम्हाला 'रॉयटर्स'चे हँडल ब्लॉक करण्याची गरज नाही. सरकारने याबाबत कुठलेही निर्देश दिलेले नाहीत. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक्ससोबत सतत संपर्कात आहोत, असे म्हटले आहे.

### काळ्या जादूच्या नावाखाली अश्लील प्रकार; गुन्हा दाखल

**नवी मुंबई :** एका व्यक्तीने विकृतीचा कळस गाठत काळ्या जादूच्या नावाखाली पत्नी व सासूला नग्न करून विधी करण्यास भाग पाडले. एवढेच नाही तर दोघींचेही अश्लील फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केले. ही लज्जास्पद घटना एप्रिल ते जुलैदरम्यान नवी मुंबईतील आरोपीच्या घरी घडली. या प्रकरणी आरोपी जावयाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

## सीए अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर

### मुंबईतील राजन काबरा देशात अव्वल

**मुंबई : प्रतिनिधी**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय)तर्फे मे २०२५मध्ये घेण्यात आलेल्या फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

सीए अंतिम परीक्षेत मुंबईचा राजन काबरा याने ६०० पैकी ५१६ गुण मिळवत देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या घवघवीत यशामुळे महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

या परीक्षांमध्ये देशभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. फाउंडेशनमध्ये गाझियाबादच्या वृंदा अगरवालने आणि इंटरमिजिएटमध्ये मुंबईच्या दिशा गोखरूने देशात पहिल्या क्रमांकावर नाव नोंदवले आहे.

सीए अंतिम परीक्षेत राजन काबरानंतर कोलकाताच्या निशिता बोथ्रा हिने ५०३ गुणांसह दुसरा आणि मुंबईच्या मानव शहा याने ४९३ गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला आहे. मुंबईतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या निकालात वर्चस्व राखत राज्याचे नाव उज्वल केले आहे.

## ट्रेनवर चढून स्टंट ओव्हरहेड वायरला हात लागून तरुण गंभीर जखमी

### नेरूळ स्टेशनमध्ये थरार

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ रेल्वेस्थानकाजवळ उभ्या असलेल्या मालगाडीवर उभे राहून स्टंटबाजी करणे एका तरुणाला भोवले आहे. बंद गाडी पाहून रिल तयार करणाऱ्या तरुणाचा स्पर्श ओव्हरहेड वायरला झाला. यात तो तरुण संपूर्णपणे भाजला गेला. या तरुणास तातडीने डॉ. डी. वाय पाटील रुग्णालयात नेण्यात आले आहे.

संबंधित तरुण १७ वर्षांचा कॉलेजवयीन असून कोपरखैरणेतील असल्याची माहिती मिळत आहे. ओव्हरहेड वायरचा धक्का बसून तो जमिनीवर कोसळला. या ठिकाणी नियमित ट्रॅकसोबत इतर ट्रॅक आहेत. त्यामुळे मेगा ब्लॉक असताना ट्रेन उभ्या केल्या जातात. या ट्रॅकवर एक ट्रेन उभी करण्यात आली होती, ज्यावर चढून संबंधित तरुण रिल तयार करत होता.





**पनवेल : आषाढी एकादशीनिमित्त नामदेव शिंपी समाजाच्या पुरातन विठ्ठल मंदिरात आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते अभिषेक आणि पूजन करण्यात आले. या वेळी भाजप पदाधिकारी, नामदेव शिंपी समाजाचे बंधू-भगिनी, भाविक उपस्थित होते. त्याचप्रमाणे आमदार प्रशांत ठाकूर यांनी परिसरातील दिंड्यांमध्ये पालखीचे भोई होत विठूनामाचा गजर केला.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्वेस्टीचर्स सेरेमनी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये तृतीय इन्वेस्टीचर्स सेरेमनी शनिवारी (दि. ५) साजरा झाला. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि स्कूलचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर व नायब तहसीलदार सुनील जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभात शालेय मंत्रिमंडळ स्थापन करून विद्यार्थ्यांचा शपथविधी झाला.

### मान्यवरांची उपस्थिती; विद्यार्थ्यांचे कौतुक

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, 'रयत'चे रायगड उपविभागीय अधिकारी विलासराव जगताप, पीआरओ बाळासाहेब कारंडे, खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, नवीन पनवेलच्या सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका रुहल दुबे, उलवेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मुख्याध्यापक श्री. सुतार, कोमल गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. **(पान २ वर..)**



## रोह्यात बसने वृद्धाला चिरडले

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा एसटी बसस्थानकात एका वृद्ध व्यक्तीच्या अंगावरून बस गेल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर चालक पळून गेला. त्याच्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

रोहा बसस्थानकात सातारा-वाई-महाबळेश्वर-महाडमार्गे रोहा एसटी बस (एमएच १४ केक्यु ३९७०) शुक्रवारी रात्री ७च्या सुमारास भरधाव वेगाने चालक चालवत होता. त्याने स्थानकात उभ्या असलेल्या ज्येष्ठ नागरिकाला ठोकर दिली. या वेळी गाडीचे पुढील व मागील चाक पोटावरून गेल्याने ज्येष्ठाचा मृत्यू झाला. मनोहर धोंडू नाखरेकर (वय ६५, रा. धनगर आळी, रोहा) असे वृद्धाचे नाव आहे. फरार बसचालक दादासाहेब बाबासाहेब चव्हाण (वय ४०, रा. आंबेपूर, ता. अलिबाग, मूळ रा. खानापूर, ता. वाई, जि. सातारा) याचा पोलीस शोध घेत आहेत.





राष्ट्रीय स्वयंसेवक संघ... स्वातंत्र्यपूर्व काळात २७ सप्टेंबर १९२५ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेली संघटना. रा. स्व. संघाला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या कालखंडात तावून-सुलाखून निघालेल्या या संघटनेने अनेक चढउतार पाहिले आहेत. संघाच्या या दीर्घ वाटचालीची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त लेखमाला सुरू करीत आहोत. गुरूपौर्णिमेला म्हणजे गुरूवार, १० जुलै २०२५ रोजी या लेखमालेतील पहिला लेख प्रसिद्ध होईल. त्यानंतर दर रविवारी पुढील लेख प्रकाशित केले जातील.

-मुख्य संपादक

निवडक

रिस येथून युवक बेपत्ता

**मोहोपाडा :** रिस येथील सुभाष लिंबाजी कुंबेफळकर



(वय ४३) रा. गोकुळनगरी सोसायटी रिस ता.खालापूर मुळ गाव आंबेजोगाई बीड यांनी घरात गावी जातो असे सांगून निघून गेले आहेत, परंतू ते त्यांचे गावी पोहचले नसल्याने घरच्यांनी नातेवाईकांकडे तपास केला परंतू शोध न लागल्याने बेपत्ता झाल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुभाष कुंबेफळकर हे रंगाने गोरे असून बोलताना अडखळतात. त्यांच्या डाव्या डोळ्याजवळ जुने जखमेचा वण आहे. ते अंगाने सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच असून चेहरा गोळ,डोळे व केस काळे आहेत. त्यांनी अंगात काळा शर्ट, क्रिम रंगाची पॅन्ट, पायात ऑरेंज शुज आहे. ही व्यक्ती कोणास दिसल्यास त्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर (९०१११२९९९४) आणि विनोद पाटील ९५२७१७३२७३/९४७०८५५२३४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एकादशीनिमित्त खिचडी वाटप

**पनवेल :** रविवारी आषाढी एकादशीनिमित्त पनवेल मधील भाजी मार्केट परिसरातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज व



विठ्ठल रुक्मिणी मंदिर या ठिकाणी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे महानगर प्रमुख आणि शिवसेना पॅरामेडिकल सेलचे कोकण विभाग प्रमुख राजाभाऊ नलावडे यांच्या पुढाकाराने भक्तांना खिचडी केळी आणि इतर खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, विनोद साबळे यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांच्या हस्ते भाविकांना प्रसादाचे व फळांचे वाटप करण्यात आले. या वेळी शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

'ईट प्ले रीड'कडून ताक वाटप



**पनवेल :** ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली ईट प्ले रीडच्या रजदूतांकडून पनवेल, नवी मुंबई विभागामध्ये ताक वाटप करण्यात आले. ईट प्ले रीडकडून नेहमीच सामाजिक, शैक्षणिक उपक्रम पनवेल–नवी मुंबई मध्ये राबवले जातात. या संस्थेचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे. संस्थेच्या वतीने पनवेल– नवी मुंबई मध्ये ताक वाटप करण्यात आले. जेणे करुण नागरिकांना त्यातून एनर्जी मिळावी शरीराला आतून थंडावा मिळावा. या वेळी अनेक नागरिक उपस्थित होते.

विवेकानंद संकुलाचा वर्धापन दिन



**नवी मुंबई :** सानपाडा विवेकानंद संकुल या शाळेचा वर्धापन दिन सोहळा झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मेघना जाधव त्याचप्रमाणे महेश देशपांडे तसेच संस्था कार्यकारणी सदस्य संजय पालकर हे उपस्थित होते. सूत्रसंचालन सारिका मिसाळ यांनी केले. प्रास्ताविक सुवर्षा सागवेकर यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी ३ जुलै १९९५ ते ३ जुलै २०२५ या कालावधीमध्ये शाळेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ऋतुजा गवस यांनी सर्वांच्या आभार मानले.

नेत्रतपासणी शिबिर उत्साहात

**उरण :** तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर



कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, फुंडे येथील आरोग्य केंद्र समिती आणि इनोविजन आय हॉस्पिटल आणि लेझर सेंटर, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने उरणचे राजे वीर वाजेकर यांच्या जयंती निम्मित मोफत नेत्रतपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. १२५ विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिरात नेत्रतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ऑटो रिफ्रॅक्टमीटर मशीनद्वारे नेत्र तपासणी करण्यात आली. इनोविजन आय हॉस्पिटल आणि लेझर सेंटर कडून तनुजा भाकरे, योगिता कडू, यश चौगुले आणि रेहाब सय्यद हे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी नेत्रतपासणीत सहकार्य केले.

पान १ वरून

लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्वेस्टीचर्स सेरेमनी

इन्वेस्टीचर्स सेरेमनीत विद्यार्थ्यांवर सोपवण्यात आलेली जबाबदारी ते यशस्वीरीत्या बजावतील, असा विश्वास या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त करून कामोठ्यातील ही शाळा रयत शिक्षण संस्थेमधील एक नामवंत शाळा आहे, असे गौरवोद्गार काढले. शाळेचे नावलौकिक कायम राखणे हे आपल्या सर्वांचेच काम आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

# मुख्यमंत्र्यांच्या महाराष्ट्रधर्म विशेष पॉडकास्टचा प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

'महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे. आणि ती एक जबाबदारी देखील आहे. आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वशंज नसलो, तरीही विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत. या सर्वांनी आपल्या ज्ञानाने, त्यागाने आणि धैर्याने हे राज्य घडविले. त्याला जपणे, वाढवणे आणि पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे स्मरण रंजन नाही. तो आपला नैतिक मार्गदर्शक. आपण कोण



आहोत, हे समजून घेऊन, आपल्याला काय घडवायचे आहे, ते ठरविणे, हाच महाराष्ट्रधर्म आहे,' अशी मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजपासून 'महाराष्ट्रधर्म' विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. ही मुलाखत सुप्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक – लेखक आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे वंशज डॉ. सदानंद मोरे यांनी घेतली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते १९ या आपल्या पहिल्या कार्यकाळात 'मी मुख्यमंत्री बोलतोय' हा टि. व्ही. शो केला होता. आता नवमाध्यमात लोकप्रिय अशा पॉडकास्टच्या माध्यमातून ते जनसंवाद साधणार आहेत.

पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ 'महाराष्ट्रधर्म : पायाभरणी आणि उभारणी' या विषयापासून झाला. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्रधर्म' या विशेष पॉडकास्ट मालिकेचे हे पहिले चरण होते. यात रामायणापासून ते महाभारतापर्यंत, जगाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवणाऱ्या गौतम बुद्धांपासून ते भक्ती संप्रदायाच्या संतांपर्यंत आणि महाराष्ट्राची अध्यात्मिक पायाभरणी आणि उभारणी या विषयांवर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समाज माध्यमावरून हे पॉडकास्ट करण्यात येत आहे.

या पहिल्याच पॉडकास्टमध्ये सहभागी झालेल्या श्रोत्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले आहेत. तसेच यापुढेही महाराष्ट्राच्या इतिहासात, संस्कृतीमध्ये, साहित्यामध्ये देवभूमी, संतभूमी, वीरभूमी म्हणून विचार आहे. या सर्वांचा धांडोळा घेतानाच, महाराष्ट्र हा महाराष्ट्र का आहे, याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न राहणार असल्याचेही म्हटले आहे.

आजच्या पहिल्याच पॉडकास्टमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राची पायाभरणी आणि उभारणीच्या अनुषंगाने मांडणी केली. 'महाराष्ट्रधर्म हा धर्म नाही. ती आहे, एक जीवंत मुल्य संहिता. ती सांगते विवेकाने विचार करा. सेवाभावाने वागा, आणि शौर्याने उभे राहा. ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून शिवरायांच्या तलवारीपर्यंत फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत ही साखळी कधी तुटलीच नाही. ती सतत पुढे सरकत राहिली,' अशा मांडणीमुळे पॉडकास्टचा प्रारंभ अभ्यासपूर्ण आणि उत्कंठावर्धक झाला. त्याला मोठा प्रतिसादही लाभला.

झाड कोसळून दोन कारचे नुकसान

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १७ येथे शनिवारी दुपारी सोसायटीतील झाड पदपथ तसेच रस्त्यावर कोसळून दोन कारचे नुकसान झाले. वाशी सेक्टर १७ येथील आर्केड सोसायटी आवारातील ही गुलमोहराचे झाड होते. ते सोसायटीची पदपथलगतची भिंत तोडून रस्त्यावर उभ्या असलेल्या कारवर पडले. त्यामुळे कार त्या महाकाय झाडाखाली दाबल्या गेल्या. यात कारचे मोठे नुकसान झाले. तर झाडाच्या फांद्यादेखील इतर कारवर पडल्याने काही कारचे किरकोळ नुकसान झाले.

शनिवार सुट्टीचा दिवस असल्याने तसेच सेक्टर १७ हा मार्केट विभाग असल्याने देखील कार पार्क केलेल्या



होत्या. नेमके हे झाड कोसळून त्या कारवर पडले. तर सोसायटीची भिंत पूर्णतः कोसळून पडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. झाड कोसळल्याने रस्ता पूर्णतः अडला गेला होता. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. अग्निशमन दलाने धाव घेत रस्ता मोकळा केला, मात्र यामुळे सोसायटी अंतर्गत देखील असलेल्या झाडांच्या फांद्यांचा छाटणीचा प्रश्न पुढे आला आहे.

एमआयडीसी रस्त्यावर बेशिस्त पार्किंगचा त्रास

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जनता विद्यालयाच्या परिसरात एम आयडीसी रस्त्याला दुचाकी, चारचाकी, अवजड वाहनांची अनधिकृत बेशिस्त पार्किंग केली जात असल्यामुळे जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळेत ये जा करताना नाहक त्रास सोसावा लागत आहे. शिवाय या रस्त्यावरुन जात असताना वाहनांचा अंदाज येत नसल्याने अपघाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

एम आयडीसीच्या या रस्त्याच्या दोन्ही बाजूला आसपासच्या परिसरातील नागरिक वाहन पार्किंग करत आहेत. अनेकजण वाहन पार्किंग करून दिवसभर येतच नाहीत. दोन्ही बाजूला वाहने पार्किंग



केल्यामुळे विद्यार्थ्यांना नेण्यासाठी आलेल्या लहान मोठ्या वाहनांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहेत. वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थ्यांच्या वाहनांना शाळेत येताना व घरी जाताना उशीर होत असतो.

मोहोपाडा बाजारपेठेत व परिसरातील बँकांमध्ये येणारे ग्राहक आपली वाहने बेशिस्तपणे रस्त्याच्या अर्ध्या भागात लावत असतात. त्यामुळे समोरून एखादे वाहन आले तर अपघात होण्याची शक्यता असते. शाळेतून पायी चालणाऱ्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून चालावे लागते. या रस्त्यावर अनधिकृतपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

कर्जत रेल्वेस्थानकात धावत्या लोकलमधून महिलेची उडी

पोलिसाने वाचवले प्राण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकावर एका धावत्या लोकलमधून उडी मारणाऱ्या महिलेचे प्राण वाचवण्यासाठी कर्जत रेल्वे पोलिस ठाण्यातील पोलीस जवानाने जीवाची बाजी लावली. वेळेवर घेतलेली ही धाडसी कृती केल्याने त्या महिलेचे प्राण वाचले.

काल शनिवारी सुनैना अखिलेश यादव (वय २५ ) व त्यांचे पती अखिलेश यादव (वय ३४) रा. शास्त्रीनगर, खोपोली हे दोघे कर्जत रेल्वे स्थानकावर आले होते. त्यांनी दुपारी ३.१५ वाजताच्या कर्जत – खोपोली लोकलमध्ये बसले मात्र गाडी सुरू झाल्यानंतर अखिलेश यादव हे काही कारणास्तव प्लॅटफॉर्मवर उतरले आणि लोकलने वेग पकडला. पती गाडीत नाहीत हे लक्षात येताच सुनैना यादव यांनी कोणताही विचार न करता धावत्या लोकलमधून उडी मारली. ही घटना पाहून गोपनीय शाखेचे पोलीस हवालदार राजेंद्र बागुल यांनी प्रसंगावधान राखून संबंधित महिलेची गाडीखाली जाण्यापूर्वीच प्लॅटफॉर्मवर खेचून तिचे प्राण वाचवले.

या अपघातात महिला जखमी झाली असून तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. याबाबत कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात जखमी नोंद क्र. ८१ / २०२५ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. या कृतीबद्दल महिलेने व तिच्या पतीने पोलीस हवालदार बागुल व कर्जत रेल्वे पोलिसांचे आभार मानले आहेत. या धाडसी कृतीसाठी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांनीदेखील बागुल यांच्या शौर्याची प्रशंसा केली आहे.

'विद्याभवन'मध्ये काव्यधारा

**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील शिक्षण संकुलात सर्व नवोदित कवींना प्रोत्साहन देण्यासाठी ज्येष्ठ कवी दिलीप जांभळे आणि कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत काव्यधारा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पांडुरंग मुळीक, शिक्षक अविनाश कुलकर्णी, शिक्षिका अश्विनी चौधरी, नीना सिंग यांनीदेखील कविता सादर केल्या. कवी दिलीप जांभळे यांनी काव्याधारा उपक्रमाचे कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा. सुजय वाबळे यांनी केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक गोरख कदम, पर्यवेक्षिका शोभा लवटे तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



**कळंबोली : भाजप कार्यालयात जनसंघाचे संस्थापक स्व. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक राजू शर्मा, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, मंडळ सरचिटणीस दिलीप बिस्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष सुनील ढेंबरे, प्रभाग अध्यक्ष घनश्याम शर्मा, प्रकाश शेलार, महिला मोर्चाच्या सुनीता हिरावले, सतीश गर्जे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

खारघरमध्ये घरफोडीच्या घटना

**पनवेल :** खारघर परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरु असून मोठ्या प्रमाणात घरफोड्या होत असल्याने गुन्हेगारीत वाढ झाली आहे. खारघर सेक्टर–१६ मधील वास्तुविहार संस्कृती सोसायटीमध्ये चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास एकाचवेळी तीन घरे फोडल्याचे उघडकीस आले आहे. त्यातील अतुल पालोदकर यांचे घर फोडून चोरट्यांनी तेथून रोख रकमेसह विविध प्रकारचा ऐवज चोरुन नेला आहे. त्याचप्रमाणे इतर घरातीलसुद्धा घरफोडीत ऐवज चोरुन नेण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या शाळांची शिक्षण परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.५) पनवेल महापालिका शाळा क्र.१ लोकनेते दि.बा पाटील विद्यालय येथे पनवेल महापालिकेच्या शाळांची शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती.

शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्र समन्वयक अशफाक काझी, वाल्मीक राठोड व वैभव पाटील तसेच पनवेल महानगरपालिका शाळांमधील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

बदलत्या काळानुसार शिक्षण क्षेत्रात घडणारे नवनवीन संशोधन व त्या अनुषंगाने विविध पैलूंवर यावेळी



सखोल चर्चा करण्यात आली. यामधून शिक्षकांना नवनवीन माहिती व दिशा मिळाली. त्यानंतर उपशिक्षक वैभव चं. पाटील व ज्ञानेश आलदर यांनी अनुक्रमे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले व वर्षभरात घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे नियोजन समजावून सांगितले.

केंद्र समन्वय श्री. काझी यांनी शाळाबाह्य सर्वेक्षण अभियान व नवभारत साक्षरता अंतर्गत आवश्यक बाबी पूर्ण करण्याविषयी मार्गदर्शन केले. केंद्रप्रमुख श्री. राठोड यांनी विविध समित्यांची रचना व कार्यपद्धती याविषयी माहिती दिली. केंद्रप्रमुख वैभव पाटील यांनी गुणवत्ता वाढ विकास प्रकल्प अंतर्गत वर्षभरात जे उपक्रम राबवले जाणार आहे त्याविषयी सखोल माहिती दिली.

पनवेल महानगरपालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी मार्गदर्शन करत असताना सर्वप्रथम शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचे व शैक्षणिक दिनदर्शिका या उपक्रमाचे कौतुक केले. मनपा शाळा क्र.०६ धाकटा खांदा शाळेतील उपशिक्षिका ज्योत्स्ना भरडा यांनी स्वखर्चाने ज्ञानरचनावादी वर्ग सजावट केल्याबद्दल त्यांचेही कौतुक केले. सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी वेळ काढून या वर्गास भेट देण्याचे आवाहनही त्यांनी केले. निपुण भारत व इयत्ता निहाय क्षमता अंतर्गत शिक्षकांनी करावयाची कार्यवाही याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरण अभ्यासक्रम आणि प्रशासकीय बाबींविषयी शिक्षकांना संबोधित केले. शासनाच्या विविध समित्या व त्याची कार्य पद्धती यांच्या विषयी सविस्तर माहिती दिली.

**पनवेल महानगरपालिकेतील शाळांमध्ये गुणवत्तावाढी साठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.**
**–रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी**
**पनवेल महापालिका.**

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी या परिषदेचे यशस्वी आयोजन महत्त्वाचे ठरले आहे.शिक्षण परिषदेच्या सुरुवातीला केंद्रप्रमुख वैभव पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना केली. उपशिक्षक सुजित म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

माथेरान भाजपचा सामाजिक उपक्रमांचा ओघ सुरूच

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान भारतीय जनता पक्ष व माथेरान मिशन ग्रुप यांच्या प्रेयत्नातून आणि गिफ्ट अ स्माईल या संस्थेच्या माध्यमातून माथेरान नगरपरिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना नियमित आहारासाठी स्टीलच्या ताटांचे वाटप करण्यात आले.जवळपास १५० पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांना याचा नियमित लाभ होणार आहे.

माथेरान भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ आणि पक्षातील सर्व आजी माजी



पदाधिकारी कार्यकर्ते यांचा सामाजिक उपक्रमांचा ओघ येथे काही कमी होत नाही. प्रत्येकवेळी माथेरान मधील विद्यार्थी व नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणे तर सुरूच असून शनिवारी भारतीय जनता पक्ष माथेरान आणि मिशन ग्रुप माथेरान यांच्या प्रमुख प्रेयत्नातून आणि मुंबई येथील गिफ्ट अ स्माईल संस्थेच्या माध्यमातून येथील नगरपरिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित आहारासाठी स्टील च्या ताटांचे वाटप करण्यात आले.

दररोज १५० पेक्षासुद्धा जास्त विद्यार्थ्यांना याचा नियमित लाभ होणार असल्याचे सांगण्यात आले. या वेळी माथेरान भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, मुख्याध्यापक दिलीप अहिरे, मिशन माथेरान ग्रुपचे संचालक अमूधन तामिळ, गिफ्ट अ स्माईल संस्थेचे जॅक्सन व स्टॅलिन तर माथेरान भारतीय जनता पक्षाचे शहर उपाध्यक्ष किरण चौधरी, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे आदी मान्यवर मंडळी तसेच शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दुखवटा

सदानंद ठोंबरे

**रसायनी :** कैरे येथील सदानंद ठोंबरे यांचे रविवारी



(दि.२९) निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा आणि चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. कै. सदानंद ठोंबरे यांचा दक्षक्रिया विधी मंगळवारी (दि.८) श्रिी क्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार आहे तर उतरकार्य शुक्रवारी (दि.११) येथे राहत्या घरी होणार आहे. या वेळी सकाळी १० ते ११ हभप रामदास (भाई)महाराज पाटील (गुरुकूल आश्रम, महड, खालापूर) यांचे प्रवचन होणार आहे.

# वाढत्या रिक्षांमुळे उत्पन्नात होतय घट

## चालकांवर उपासमारीची वेळ

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात पूर्वी मोजक्याच रिक्षा होत्या त्यामुळे रिक्षा चालकांना चांगला रोजगार उपलब्ध होत होता. कालांतराने औद्योगिकीकरण वाढले. लोकसंख्या वाढली. दळणावळणाची साधने वाढले. सुख सुविधा वाढल्या त्यामुळे त्याचा प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष परिणाम रिक्षा चालकांवर झाला आहे. उरण तालुका तालुक्यात दिवसेंदिवस रिक्षांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे रिक्षाचालकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, कर्जाचे हप्ते भरू की कुटुंबाच्या पोटाची खळगी, असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला आहे.

उरण तालुक्यात खासगी वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली असतानाच रिक्षांची संख्याही वाढू लागली आहे. त्यामुळे या व्यवसायातही स्पर्धा सुरू झाली असून हा व्यवसाय करणाऱ्यांचे उत्पन्न घटू लागले आहे. त्यामुळे रिक्षासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करतानाच कसरत होत असल्याने उरलेल्या उत्पन्नातून कुटुंबाचे पोट कसे भरायचे, ही चिंता रिक्षा व्यावसायिकांना सतावत आहे. कमी अंतरावर जाण्यासाठी सर्वांनाच रिक्षा हे साधन सोयीस्कर ठरत असते. त्यामुळे या व्यवसायात येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. बहुतेक जणांनी रिक्षासाठी कर्ज घेतलेले असल्याने त्याची यातूनच परतफेड होत असते आणि उदरनिर्वाह सुरू असतो, मात्र रिक्षांची संख्या वाढल्याने प्रत्येक व्यावसायिकालाच आता यातून पुरेसे उत्पन्न मिळेनासे झाले आहे. त्यामुळे मुलांची शाळेची फी, पुस्तके, शैक्षणिक साहित्य महागल्याने हा खर्च करताना नाकीनऊ येत आहे. अशातच संघटनेव्यतिरिक्त काही रिक्षा चालक हे बाहेरूनच कमी पैशांमध्ये प्रवासी भाडे मारत असल्याने त्याचा मोठा फटका संघटनेतील रिक्षा चालकांना बसला आहे.



या रिक्षा व्यवसायात मोठ्या प्रमाणात बेरोजगार मराठी तरुण आहेत. अगोदरच नोकऱ्या नाहीत. त्यात व्यवसाय करूनही पोट भरत नसल्याने रिक्षा चालकांवर उपासमिरिची वेळ आली आहे. कंपनीत नोकऱ्या असूनही तसेच घरची परिस्थिती चांगली असूनही, श्रीमंत असूनही अनेक तरुण, नागरिक या धंद्यात उतरले आहेत व शासन आर्थिक परिस्थिती व इतर कोणत्याही गोष्टी न बघता सरसकट सर्वांना परमिट देत आहे. रिक्षा घेण्याची सर्वांनाच परमिशन देत आहे. त्यामुळे ज्यांना कोणाचाच आधार नाही जे बेरोजगार तरुण आहेत, गरीब होतकरू आहेत त्यांच्या पोटावर पाय पडले आहे. जे नोकरी करतात तसेच जे श्रीमंत आहेत त्यांना नवीन रिक्षा घेण्यासाठी किंवा चालविण्यासाठी परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी रिक्षा चालकांनी केली आहे.

> **जे रिक्षा स्क्रॅपच्या आहेत त्यांनाही एचआरपी नंबर दिले जात आहेत. उरण मोरा रोड वर अशा रिक्षा भरपूर आहेत पोलीस मात्र त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत. सर्व सामान्य रिक्षाचालकांना जगणे मुश्किल झाले आहे. नवीन रिक्षाच्या वाढत्या संख्येमुळे स्पर्धा निर्माण झाली असून स्पर्धेत टिकणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे.**
>
> **–दिनेश हळदणकर, अध्यक्ष, रिक्षा संघटना, गणपती चौक, उरण शहर**

# एमडी विकणाऱ्यास खारघरमधून अटक

## दहशतवादविरोधी पथकाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

दहशतवाद विरोधी पथकाच्या नवी मुंबई युनिटने खारघरमधून मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ विकण्यासाठी आलेल्या तरुणाला अटक केली आहे. परवेज फिरोज मन्सूरी (वय ३८) असे त्याचे नाव असून, त्याच्याजवळ सापडलेला एक लाख ४४ हजार रुपये किमतीचा ३६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन जप्त केला आहे. आरोपीने ज्या व्यक्तीकडून मेफॅड्रॉन आणले, त्याचा दहशतवाद विरोधी पथकाकडून शोध सुरू आहे.

### सिगारेटच्या पाकिटात अमली पदार्थ

*अमली पदार्थ विक्रीप्रकरणी अटक केलेल्या आरोपीला पोलिसाचा संशय आल्याने त्याने अमली पदार्थ असलेले दोन्ही सिगारेटची पाकिटे रस्त्यालगत टाकून दिली होती. पोलिसी खाक्या दाखवतातच त्याने दहशतवाद विरोधी पथकाला माहिती देताच सिगारेटची पाकिटे जप्त करण्यात आली.*

खारघर सेक्टर-२ मधील कोर्टयार्ड कॅफेजवळ एक व्यक्ती मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाच्या नवी मुंबई युनिटला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रतिभा शेंडगे व त्यांच्या पथकाने खारघरमधील कोर्ट यार्ड कॅफेजवळ सापळा लावला होता. या वेळी परवेज फिरोज मन्सूरी हा एका कारमधून संशयास्पदरीत्या फिरताना आढळला असता, दहशतवाद विरोधी पथकाने त्याला ताब्यात घेतले.

आरोपीने दोन सिगारेटच्या पाकिटात प्लॅस्टिक पिशवीत लपवून मेफेड्रोन (एमडी) आणल्याचे आढळले. पथकाने त्याच्याकडे सापडलेला एक लाख ४४ हजार रुपये किमतीचे ३६ ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन जप्त केले. परवेजविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. परवेजने मालाड येथील रफिक नावाच्या व्यक्तीकडून हे मेफेड्रोन आणल्याचे चौकशीत सांगितले आहे.

# ६,६०८ जणांना मिळाली रेशनवरील साडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना वर्षातून एकदा एक मोफत साडी दिली जाते. विशेष म्हणजे शासनाने निश्चित केलेल्या सणादिवशी या साडीचे वाटप केले जाते.

पनवेल तालुक्यात सहा हजार सहाशे आठ जणांना रेशनवरील साडी मिळाली आहे. अंत्योदय शिधापत्रिका कारखाना दरवर्षी एक मोफत साडी दिली जाते. या कार्डधारकांना साडी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.





राज्य सरकारची ही योजना असून या योजनेंतर्गत, अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना दरवर्षी एक साडी दिली जाते. ही साडी रेशन दुकानांमध्ये दिली जाते. फक्त अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळतो.

पनवेल तालुक्यात आतापर्यंत सहा हजार ६०८ अंत्योदयचे कार्डधारक आहेत. रेशन दुकानातून या सर्वांना साडी वाटप करण्यात आले आहे. एकूण सहा हजार सहाशे आठ जणांना साड्यांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी एक साडी रेशन दुकानावर मोफत मिळत आहे.





**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# जेबीएसपीएस इंडस्ट्रियल सेफ्टी इन्स्टिट्यूटचा रौप्य महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेबीएसपीएस इंडस्ट्रियल सेफ्टी इन्स्टिट्यूटने आपल्या स्थापनेच्या २५ यशस्वी वर्षांचा रौप्यमहोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला. इंडस्ट्रियल सेफ्टीच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या या संस्थेचा हा महत्त्वपूर्ण टप्पा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.



या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या स्थापनेपासून त्यांच्या दूरदृष्टीने आणि मार्गदर्शनाने संस्थेने मोठी प्रगती केली आहे. या वेळी कार्यकारी मंडळ सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांनीदेखील उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायक मार्गदर्शन केले. संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख आणि माजी प्राचार्य प्रा. स.अ. उस्मानी यांनीदेखील संस्थेच्या प्रवासावर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन व संचालन संस्थेचे प्रमुख नदीम एस. उस्मानी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि गेल्या २५ वर्षांत संस्थेला साथ देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानले.

कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरले ते संस्थेचे माजी विद्यार्थी, जे आता विविध नामांकित कंपन्यांमध्ये महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. हे सर्व माजी विद्यार्थी या रौप्यमहोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, ज्यामुळे संस्थेचा सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रात झालेला प्रभाव अधोरेखित झाला.

या वेळी सर्व प्राध्यापकवर्ग उपस्थित होता तसेच मागील वर्षीचे टॉप तीन विद्यार्थीदेखील उपस्थित होते, ज्यांना त्यांच्या शैक्षणिक यशासाठी सन्मानित करण्यात आले. हा रौप्यमहोत्सव फक्त एक इतिहास नव्हता, तर भविष्यासाठी नवी दिशा आणि प्रेरणा देणारा उत्सव ठरला. संस्थेने इंडस्ट्रियल सेफ्टीच्या शिक्षणात उच्च दर्जा राखत पुढील वाटचाल करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षपदी निलेश पोटे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षपदी निलेश पोटे यांची निवड झाली असून सचिवपदी हितेश राजपूत हे सन २०२५-२६ची धुरा सांभाळणार आहेत. या पदग्रहण समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर आणि डिस्टिक गव्हर्नर संतोष मराठे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

हा कार्यक्रम नवीन पनवेल मधील रोटरी कम्युनिटी सेंटरमध्ये मोठ्या थाटात झाला. रोटरी क्लबच्या परंपरेनुसार हा कार्यक्रम होत असताना मागील वर्षाचे अध्यक्ष चारुदत्ता भगत आणि सचिव तुषार तटकरी यांनी आपला पदभार नवनिर्वाचित अध्यक्ष निलेश पोटे व सचिव हितेश राजपूत यांच्याकडे सुपूर्द केला.



या वेळी शुभेच्छा देताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, रोटरीचे कार्य हे तळागळातील तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी होत असते मी सुद्धा या रोटरीचा सदस्य असल्याचा मला अभिमान आहे, असे गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाला डॉ. प्रमोद गांधी, अरविंद सावळेकर, वर्षा प्रशांत ठाकूर, डॉ. जयश्री पाटील, डॉ. प्रकाश पाटील, काशिनाथ पोटे, प्रमोद वालेकर, संजय जैन, गुरुचरण कोहली आदी उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये विठूनामाचा गजर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्त पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या माध्यमातून नवीन पनवेलमध्ये दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. नवीन पनवेल सेक्टर १५ येथील सावतामाळी मंदिरापासून या सोहळ्याला सुरुवात झाली असून संपूर्ण पोदी परिसरातील विठ्ठल नामाचा गजर करत दिंडी फिरवण्यात आली. या दिंडी सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.



आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे. या सणानिमीत्त पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत आणि श्री. संत सावतामाळी ट्रस्टच्या वतीने नवीन पनवेलमध्ये दिंडी सोहळा आयोजीत करण्यात आला होता. सर्वांनाच पंढरपूर पर्यंत पायी वारी जमत नाही. वारीचा आनंद त्यामुळे सर्वांना घेता यावा या दृष्टिकोनातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या दिंडीत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ, माजी नगरसेविका मंदा अनिल भगत, राजश्री वावेकर, वर्षा ठाकूर, स्वाती कोळी, सावता माळी ट्रस्टचे अध्यक्ष आनंता लोंढे, एकविरा मित्र मंडळाच्या अध्यक्षा छाया वाघे, सावता माळी ट्रस्टच्या विठाबाई तुकाराम लोंढे, राकेश भुजबळ, अभिलाषा ठाकूर, अनिल लोंढे, मुक्ताई भजन मंडळाच्या अध्यक्षा अनिता भोर, किशोर मोरे, अर्चित घरत, कमलाकर घरत, शैलेश पाटील, श्रीकृष्णा महाडिक, सुजाता पाटील, सरोज मोरे, वैशाली पाटील, प्रभा सिन्हा, सोनाली कुदळे, संध्या लोंढे, कोमल महेंद्र ठाकूर, वेदांग पाटील यांच्यासह नागरिक या दींडी सोहळ्यामध्ये विठुनामाचा गजर करत सहभागी झाले.

# खारघरमध्ये आषाढीनिमित्त पालखी सोहळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्त खारघर नगरी विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेली. खारघर आषाढी दिंडी समिती आणि सकल हिंदू समाज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला दिंडी सोहळा रविवारी अलोट उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या धार्मिक कार्यक्रमात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले. पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी या सोहळ्याला उपस्थिती राहून आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

खारघर येथील राम जानकी मंदिरातून दिंडी सोहळ्याला सुरुवात झाली. आकर्षक फुलांनी सजवलेली पालखी आणि पताका हातात घेऊन भाविकांनी विठूनामाचा गजर करत परिसर दणाणून सोडला.



या दिंडीचा समारोप खारघर सेक्टर ३ येथील श्री विठ्ठल मंदिराजवळ झाला.

# आषाढीनिमित्त तळोजा परिसरात दिंडी

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून, तळोजा फेज येथे लोकनाथ शिवमंदिरापासून पेंधर गावातील विठ्ठल रखुमाई मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली. या भक्तीमय सोहळ्यासाठी तळोजा आणि परिसरातील अनेक भाविकांनी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली, लोकनाथ शिवमंदिरात पारंपरिक पूजा-अर्चा आणि आरती झाल्यानंतर दिंडीला सुरुवात झाली.



मजय जय राम कृष्ण हरीफ आणि मविठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलफ च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या भक्तीमय सोहळ्याचे आयोजन भाजपा नेते प्रल्हाद केणी यांनी केले होते. या वेळी निर्दोष केणी, संतोष बुवा पाटील, दिलीप बुवा केणी, प्रदीप पाटील, संजीव पांडे, आशा बोरशे, संतोष पानसरे, संदीप बांडेकर, शिल्पा गायकवाड, मनीषा नागळे यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार महेश बालदी यांचा पालखीत सहभाग

**उरण : वार्ताहर**

आषाढी एकादशी निमित्ताने उरण तालुक्यातील ठीक-ठिकाणी विठ्ठल-रखुमाईच्या मंदिरात सकाळ पासूनच नागरिकांनी दर्शासाठी गर्दी केली होती. उरण तालुक्यातील भेंडखळ, मोरा कोळीवाडा, बोरी, उरण शहरातील देवूळवाडी आदी ठिकाणी विठ्ठल रखुमाई च्या मंदिरात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती.



मोरा कोळीवाडा येथील आदिनाथ नामधारक मंडळ च्या वतीने पायी दिंडी पालखी काढली होती मोरा गावातील ग्रामस्थ व् महिला वर्ग मोठ्या संखेने सहभागी झाले होते .

मोरा कोळीवाडा येथून पायी दिंडी पालखी काढण्यात आली होती. पुढे भवरा, बोरीयेथील विठ्ठल मंदिरात द्वारकानाथ म्हात्रे यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे फराळ व चहा देण्यात आला. पेन्शनर पार्क जवळील आमदार महेश बालदी संपर्क कार्यालय जवळ आमदार महेश बालदी यांनी पालखीचे दर्शन घेतले. सोबत उरण नगरपरिषद माजी नगरसेवक कौशिक शाह व कार्यकर्ते उपस्थित होते. देवूळवाडी येथील विठ्ठल मंदिरात सर्वांना फराळ व चहा देण्यांत आले.

पालखीचे नागाव येथील सारा प्रोडक्शन चे सर्वेसर्वा राजेश पाटील व कांचन राजेश यांनी पालखीचे दर्शन घेतले पूजा केली. सर्वांचे स्वागत केले. राजेश पाटील यांच्या वतीने पालखी व दिंडीतील सर्व भक्तांना,साबुदाणे खिचडी, स्वीट, केळी व चहा देण्यांत आला. पुढे नागाव येथील जीवन मुक्त स्वामी मठी तिथे फराळ व चहा घेवून पीरवाडी समुद्र किनारा येथे येवून सांगता समारोप करण्यात आला.

## संपादकीय

# मनोमिलन की अपरिहार्यता?

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे २० वर्षांनंतर राजकीय व्यासपीठावर एकत्र आले. दुरावलेले कोणतेही दोन भाऊ एकत्र येणे खरंतर चांगली गोष्ट आहे, पण उद्धव आणि राज यांच्यात मनोमिलन होण्यात मराठीचा मुद्दा निमित्तमात्र असून खरे कारण त्यांच्या राजकीय अस्तित्वामागची अपरिहार्यता आहे.

**राज्य सरकारने तृतीय भाषेसंदर्भात जारी करण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय रद्द करून विद्यार्थीहिताचा निर्णय घेण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती सरकारने स्थापन केली आहे. हिंदीविरोधात राज आणि उद्धव ठाकरे एकत्र मोर्चा काढणार होते, पण निर्णय रद्द झाल्यानंतर मोर्चाऐवजी मेळावा झाला. या मेळाव्याची चर्चा खूप झाली, कारण राज आणि उद्धव या ठाकरे बंधूंमध्ये राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी फूट पडली होती. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षाची सूत्रे उद्धव यांच्या हाती जात असल्याने राज ठाकरे पहिल्यापासूनच अवस्थ होते. स्वाभाविकपणे राज यांचे संघटना वाढीत योगदान होते. ते पक्षात तरुणपणापासून सक्रिय होते. अनेक लढे, आंदोलनात त्यांचा सहभाग असे. दुसरीकडे उद्धव संघटनेत कुठेच नव्हते. मुळात त्यांना यामध्ये तेव्हा स्वारस्यच नव्हते. त्यांची रूची फोटोग्राफीमध्ये होती. असे असताना त्यांना थेट पक्षाचे कार्याध्यक्ष बनवणे राज यांना रूचले नाही. तेव्हा ते गप्प बसले, मात्र कालांतराने त्यांनी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र करून महाराष्ट्र नवनिर्माण सेना या नव्या पक्षसंघटनेची निर्मिती केली. जनतेची राज यांना चांगलीच पसंती मिळाली. त्यांचे व्यक्तिमत्त्व, आक्रमक वक्तृत्व शैली, लढावू बाणा लोकांना आवडला आणि पहिल्याच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना मनसेचे १३ आमदार निवडून आले. खुद्द शिवसेनेलासुद्धा पहिल्या प्रयत्नात एवढे यश मिळाले नव्हते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विशेषत: पालिकांमध्येही राज यांचे मनसैनिक निवडून आले. अचानक मिळालेले राजकीय वैभव मात्र त्यांना टिकवता आले नाही. दुसऱ्या बाजूला बाळासाहेबांचा पुत्र आणि पर्यायाने शिवसेनेचा पुढील राजकीय वारसदार म्हणून मिळालेल्या संधीचा उद्धव यांना पूर्वपुण्याईने लाभ मिळाला. पुढे भाजपसोबत युती केल्यामुळे शिवसेनेला २०१४मध्ये सत्तेवर बसता आले. २०१९मध्ये सत्तेची हाव वाढल्यामुळे उद्धव ठाकरे यांनी भाजपशी युती तोडून विचारधारेशी फारकत घेत आणि ध्येय धोरणांना हरताळ फासत महाविकास आघाडीशी हातमिळवणी करून मुख्यमंत्रिपद पदरात पाडून घेतले, मात्र ते त्यांना झेपलेच नाही. शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी उठाव केल्यानंतर राज्यात सत्तापरिवर्तन झाले. तेव्हापासून उद्धव ठाकरे यांच्या राजकीय कारकिर्दीला उतरती कळा लागली आहे. नाही म्हणायला लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्हमुळे आघाडीला थोडी धुगधुगी मिळाली, पण त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत 'उबाठा'सह आघाडीचा धुव्वा उडाला. उद्धव यांच्या अकार्यक्षम शैलीला कंटाळून अनेक नेते पक्ष सोडून गेले. ही गळती सुरूच आहे. मनसेचीही अवस्था बिकट आहे. अशा परिस्थितीत एकत्र येण्यावाचून त्यांना पर्याय नाही. तरीही राज हे आगामी निवडणुकांपर्यंत उद्धव यांच्यासोबत असतील का हा प्रश्न आहे. उद्धव यांनी मेळाव्यात पुढील काळातही आम्ही एकत्र असू अशी साद घातली. राज यांनी मात्र असे काहीही विधान केले नाही. शिवाय हे दोघे भाऊ एकत्र आलेच, तर महाविकास आघाडीतील काँग्रेस व इतर पक्षांची काय भूमिका असेल, हेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे. पाहूया पुढे काय होतेय...**

# कर्जत तालुक्यातील हरिनाम सप्ताहाची परंपरा



**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यातील पंचेचाळीस गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या सप्ताहांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम केले जातात. कर्जत शहरापासून ते अगदी तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातही अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. त्यामुळे चार-पाच महिन्यात कर्जत तालुका भक्तिमय असतो. आषाढी व कार्तिकीवारी साठी कर्जत तालुक्यातून हजारो भाविक जात असतात. पूर्वी पावसाळा वेळेत सुरू होऊन वेळेतच परतत असे. त्यामुळे भात शेतीच्या पेरण्या वेळेवर होऊन आषाढी एकादशीच्या पूर्वीच भात लावण्या पूर्ण होत असत. त्यामुळे शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात वारीमध्ये सहभागी होत असे. यंदा शेतीलायक पाऊस पडत नसल्याने बहुतांश गावांमधील भातपिकाच्या लावण्या खोळंबल्या असल्याने काही शेतकऱ्यांची पंढरपूर वारी चुकली आहे.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन वर्षांपूर्वी करण्यात आपले होते. त्यानंतर भाऊ केलटकर, हरिभाऊ वैद्य, विश्वासराव शिंदे, नामदेव दगडे, ह.भ.प. हरिभाऊमहाराज राणे, ह.भ.प. मारुतीमहाराज राणे, वसंत दानवे, सुरेश पिंपरे आदींनी कर्जत तालुका परिसर कर्जतच्या श्री कपालेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या छोटयाशा मैदानात नेण्यात आले. त्याचे स्वरूप इतके वाढले की नंतर ज्ञानेश्वर माऊलींचे सप्त शताब्दी वर्षानिमित्ताचे औचित्य साधून १९९१ सालापासून हा सप्ताह पोलीस मैदानात आयोजन करण्यात येऊ लागले. या वेळी हे सर्व कार्यकर्ते ज्येष्ठ कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांच्याकडे गेले. तेथे महाराजांनी तुम्ही माळकरी होणार असेल तर मी तुमच्या सप्ताहात दोन दिवस कीर्तनासाठी येईन, असे सांगितले. त्या वेळी विश्वासराव शिंदे, सुरेश पिंपरे आदींनी त्यांच्या हस्ते तुळशीच्या माळा गळ्यात घातल्या आणि ह.भ.प. बाबामहाराज सातारकर कर्जतला आले. त्यांनी दोन दिवस कीर्तन सेवा केली. त्या वेळी कर्जत तालुक्यातीलच नव्हे; तर रायगड, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी भाविक आले होते.

या सप्ताहाची देणगी रूपाने आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम चिवडेवाले म्हणून ओळखले जाणारे दत्तात्रेय देशमुख यांच्याकडे होती. सुरुवातीला नामदेव दगडे अध्यक्ष होते. त्यानंतर दामुअण्णा आठवले यांनी १९९० सालापासून अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. २००४ साली शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष झाले. त्यांच्या निधनानंतर ह.भ.प. नथुराम हरपुडे हे अध्यक्षपद सांभाळत आहेत. स्व. ज्ञानेश्वर तिवाटणे यांनी अनेक वर्षे सचिवपद सांभाळले होते. त्यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे. संतोष वैद्य, नरेंद्र जोशी, मोहन ओसवाल, वनिता म्हसे, शिवाजी भासे, शिवलाल गुप्ता, दत्तात्रेय म्हसे, संभाजी देशमुख, मिलिंद तिवाटणे, अमोल देशमुख आदी कर्जतच्या अखंड हरिनाम सप्ताहाची जबाबदारी सांभाळतात. हे सर्वच जण आषाढी वारीमध्ये उपस्थिती दर्शवित असतात. कर्जतमधील काही दानशूर भाविक पुणे, हडपसर, लोणी येथे अन्न सेवाही देत असतात. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला शिशुमंदिर, शारदा मंदिर, विद्या विकास मंदिर शाळांमधील काही विद्यार्थी संतांची भूमिका साकारून श्री कपालेश्वर मंदिरापर्यंत दिंडीचे आयोजन करीत येत असतात.

ह.भ.प. मारुतीमहाराज राणे यांनी कर्जत सह अनेक तालुक्यात कीर्तन सेवा व अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हजारो जणांना व्यसनमुक्त केले. हजारो जणांना माळकरी केले. त्यांची कोकण दिंडी प्रसिद्ध आहे. त्यांना रायगड मित्र पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक वारकरी त्यामध्ये सहभागी होतात. ह.भ.प. बाळासाहेबमहाराज फणसे यांनी कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. ह.भ.प. वामनमहाराज मोधळे, ह.भ.प. मोरेश्वरमहाराज पेमारे, ह.भ.प. नथुराममहाराज हरपुडे, ह.भ.प. मारुतीमहाराज लोभी, ह.भ.प. भरतमहाराज देशमुख, ह.भ.प. द्वारकानाथमहाराज देशमुख, ह.भ.प. प्रवीणमहाराज फराट, ह.भ.प. हरिश्चंद्रमहाराज जाधव, ह.भ.प. योगिनीमहाराज थरकुडे आदी कीर्तनकारांनी कर्जतमध्ये कीर्तन रुपी सेवेने समाज प्रबोधनाचे काम केले.ह.भ.प. श्रीराममहाराज पुरोहित, ह.भ.प. दिलीपमहाराज राणे हेसुद्धा कीर्तन, प्रवचने करून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत.

या बहुतेक कीर्तनकारांना रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. या सर्व कीर्तनकारांना रंभाजीबुवा थोरवे, मनोहर कडू, सुरेशबुवा फराट हे अजूनही मृदंगाची साथ देत आहेत. तालुक्यात कर्जत, इंजिवली, वेणगाव, तमनाथ, हलीवली आदी अखंड हरिनाम सप्ताह प्रसिद्ध आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे सुमारे सहा महिने कर्जत तालुका भक्तीरसात डुंबलेला असतो. तसेच आषाढी व पंढरपूर वारीला जाण्यासाठी नेहमीच उत्सुक असतात.

ज्यांना संपूर्ण वारीमध्ये सहभागी होता येत नाही. ते वारीच्या मार्गावर कुठेतरी सहभागी होऊन २५ ते ३० किलोमीटर चालत असतात, तर काही जण आषाढी एकादशीच्या तीन चार दिवस आधी निघून पंढरपूरला पोहचतात. तालुक्यातून हजारो भाविक पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जातात. अशा प्रकारे कर्जत तालुक्याला आध्यात्मिक परंपरा आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# एआय पार्टनर्स आता मानवी नात्यांची जागा घेणार?

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माणसं भावनात्मकदृष्ट्या जोडली जाण्यापेक्षा तंत्रज्ञानानं अधिक जोडली जात आहेत. आधुनिक तंत्रज्ञान हेच आता त्यांचे मित्र, सखे, सोबती झाले आहेत. साहजिकच प्रत्यक्ष मैत्रीपेक्षा, जोडीदारापेक्षा जास्त काळ ही तरुणाई या आभासी मैत्रीच्या जगात जास्त जगत असते. तरुणांच्या विशेषत: 'जेन झी' पिढीच्या बाबतीत हे अधिकच खरं आहे. 'जेन झी' म्हणजे अशी पिढी, ज्यांचा जन्म साधारणपणे १९९७ ते २०१२च्या दरम्यान झाला आहे. याच पिढीला 'डिजिटल नेटिव्हज' असंही म्हटलं जातं, कारण इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या युगात ही पिढी वाढलेली आहे आणि त्यानंच त्यांचं सारं आयुष्य व्यापलेलं आहे.



'जॉई एआय' या एआय चॅटबॉट कंपनीनं नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणात धक्कादायक निष्कर्ष समोर आला आहे. एआय आणि तरुण पिढी यांच्या भावनात्मक नात्यासंदर्भाचा अभ्यास त्यांनी केला. त्यानुसार त्यांनी जगभरातील तरुणाईचा सॅम्पल सर्व्हे केला. त्यात तब्बल ८० टक्के तरुणांनी सांगितलं, भविष्यात ते 'एआय मॉडेल'शी लग्न करतील. ८३ टक्के तरुणांनी सांगितलं, एआय मॉडेलशी आम्ही भावनात्मकदृष्ट्या खूप जवळ आहोत आणि त्यांच्याशी आमचं नातं तयार झालं आहे! ७५ टक्के तरुणांनी सांगितलं, एआय पार्टनर्स आता मानवी नात्यांची जागा घेईल असं आम्हाला खात्रीनं वाटतं.

मनुष्य आणि एआय रिलेशनशिपच्या या नात्याला कंपनीनं एक नवीनच नाव दिलं आहे- 'एआय-लेशनशिप्स'! भविष्यकाळात ही नाती आणखी वेगानं वाढत जातील आणि मानवी नात्यांना ती पर्याय ठरतील, असं कंपनीचं म्हणणं आहे.

कंपनीचे रिलेशनशिप थेरपिस्ट आणि एक्स्पर्ट जयमे ब्रोनेस्टिन यांचं म्हणणं आहे, 'एआय-लेशनशिप्स'ची नाती वाढावीत, ती मानवी नात्यांना पर्याय ठरावीत हा हेतू नाही, पण तुम्ही जेव्हा खरोखरच एकटे असता दुसरा कोणताही पर्याय तुमच्यासमोर नसतो, तेव्हा भावनिक आधार देण्याचं काम ही नाती करू शकतात. आजच्या काळात अनेकजण विशेषत: तरुण पिढी खूप तणावात आहे. अनेकांना प्रत्यक्षात कोणी सोबतीच नाही. ऐकून घेण्यासाठी कोणी नाही. त्यांना 'एआय मॉडेल्स' हाच अखेरचा आणि एकमेव सहारा असणार आहे.

# स्वर चंद्रिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर



**निमित्त**

चतुरस्र गायिका व संगीतकार पद्मजा फेणाणी यांचा जन्म ७ जुलै १९६२ साली मुंबईतील एका कलासक्त कुटुंबात झाला. फेणाणी हे सारस्वत ब्राह्मण कुटुंब मूळ कारवारचे. वडील शंकर फेणाणी हे व्यावसायिक चित्रकार व संगीताचे विशेष प्रेमी. आई शैलजा फेणाणी या हस्तकलाकौशल्यात निपुण. थोरल्या भगिनी उषा फेणाणी या उत्तम व्यक्तिचित्रणकार. बालपणापासूनच पद्मजावर अभिजात संगीताचे संस्कार होत गेले. त्यांच्या थोरल्या भगिनी उषा फेणाणींनीच त्यांना संगीताचे प्राथमिक धडे दिले.

पद्मजा फेणाणींचे शालेय शिक्षण दादरच्या बालमोहन विद्यालयातून झाले. त्यानंतर रुपारेल महाविद्यालयामधून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर सोमय्या महाविद्यालयामधून सूक्ष्मजीवशास्त्र हा विषय घेऊन त्यांनी विज्ञानाची पदवी संपादन केली.

वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी वडिलांचे मित्र सुप्रसिद्ध सतारवादक अब्दुल हलीम जाफरखाँ यांनी पद्मजाचे गाणे ऐकल्यावर तिला शास्त्रीय गायन शिकविण्याचा सल्ला दिला. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत त्यांना गुरू लाभला नव्हता, परंतु ग्रहणशक्तीतून त्यांचे गायन विकसित होत होते. वयाच्या चौदाव्या वर्षी मुंबई दूरदर्शनच्या 'किलबिल' या कार्यक्रमातून त्या गायल्या. वयाच्या अठराव्या वर्षी १९८० साली या एकाच वर्षात वेगवेगळ्या २५ स्पर्धांत भाग घेऊन त्यांनी प्रत्येक स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले होते. सी. रामचंद्र, जयदेव आणि एस.एन. त्रिपाठी यांसारख्या मातब्बर संगीत दिग्दर्शक असलेल्या परीक्षकांकडून पद्मजा यांना १९८० साली 'सुरसिंगार'चा एस.डी. बर्मन पुरस्कार लाभला. त्यांचे खऱ्या अर्थाने शास्त्रोक्त संगीत शिक्षण १९८० सालापासून रीतसर सुरू झाले. उत्तर भारतीय रागदारी संगीतातील सुप्रसिद्ध गायक पं. जसराज यांच्या त्या गंडाबंध शागीर्द झाल्या. त्यांच्याकडे शिकत असतानाच पं. हृदयनाथ मंगेशकरांची त्यांच्याशी ओळख झाली. पुढे हृदयनाथांच्याही त्या शिष्या झाल्या. चार वर्षांच्या पं. जसराजांच्या तालमीनंतर त्या सुप्रसिद्ध सारंगीवादक पं. रामनारायण यांच्याकडेही पाच सहा वर्षे शिकल्या.

दूरदर्शनवरील 'शब्दांच्या पलीकडे' या कार्यक्रमातून त्या रसिकांपर्यंत पोहोचल्या. 'शब्दांच्या पलीकडे' या कार्यक्रमात १९८१ साली शांताराम नांदगावकरांचे 'धुंद मंद ही अशीच सांज उतरली' हे अनिल मोहिल्यांनी संगीतबद्ध केलेले गाणे त्यांनी सादर केले. दूरदर्शनवर हे त्यांचे पहिलेच सादरीकरण होते. या गाण्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. लता मंगेशकरांनी तिच्या गाण्याबद्दल गौरवोद्गार काढले. यानंतर त्यांची सांगीतिक कारकीर्द झपाट्याने फुलत गेली. 'निवडुंग' या चित्रपटासाठी १९८४ साली 'केव्हातरी पहाटे' व 'लव लव करी पातं' ही दोन गाणी हृदयनाथांनी पद्मजाच्या आवाजात ध्वनिमुद्रित केली. त्यांना भारत सरकारचा पद्मश्री (२००१) हा पुरस्कार मिळाला. त्यांना मियां तानसेन पुरस्कार (१९८५), 'भारत निर्माण' पुरस्कार (१९८८), आदर्श नागरिक पुरस्कार (१९८५), माणिक वर्मा पुरस्कार (२०००) इत्यादी पुरस्कार प्राप्त झाले. कुसुमाग्रजांनी त्यांना 'स्वरचंद्रिका' म्हणून संबोधले आहे.

'सगुण-निर्गुण' या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील सदरातून त्यांनी आपल्या सांगीतिक जीवनातील अनुभव अतिशय संवेदनक्षमतेने शब्दबद्ध केले आहेत. त्या १९८८ साली व्यवसायाने अभियंता असलेल्या सुनील जोगळेकरांबरोबर विवाहबद्ध झाल्या.

(साभार : मराठी एव्हरग्रीन साँग्स)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# कुत्रं चावल्यावर तातडीने करा 'हे' काम

उत्तर प्रदेशच्या बुलंदशहरातील राज्यस्तरीय कबड्डी खेळाडू ब्रजेश सोलंकी याचा अलिकडेच कुत्रं चावल्यावर रेबिज झाल्यानं जीव गेला. रेबिजमुळे जीव जाणाऱ्यांची संख्या भारतात मोठी आहे. अशात कुत्रा चावल्यानंतर काय करावे आणि काय करू नये हे पाहुयात...



गल्लीतील कुत्र्यांनी लोकांवर हल्ला केल्याच्या अनेक घटना अलिकडे भरपूर समोर येतात. मोकाट कुत्र्यांकडे लहान मुलांचे लचके तोडण्यात आल्याच्या अनेक घटनाही समोर आल्यात. अशात कुत्रा चावल्यावर काय करायला हवं हे माहीत असणं महत्वाचं ठरतं.

कुत्रा चावल्यावर 'ही' लक्षणं दिसताच व्हा सावध

ताप येणे, भूक न लागणे, उलटीसारखं वाटणे, जुलाब लागणे, नाकातून पाणी येणे, फार जास्त शिंका येणे, हात आणि पायांवर सूज, जळजळ जाणवणे.

**कुत्रा चालल्यावर काय करावे?**

ज्या जागेवर कुत्र्यानं चावलं आहे, ती जागा लवकर साफ करा. पाणी लावायला अजिबात घाबरू नका. ही जखम १० ते १५ मिनिटं अँटी-सेप्टिक सोप व पाण्यानं साफ करा.

जखम साफ केल्यावर त्यावर अँटीसेप्टिक लावा. हे केल्यावर रक्तस्त्राव कमी व्हायला हवा. जर असं झालं नाही तर पट्टी बांधून रक्तस्त्राव रोखा. त्यानंतर लगेच डॉक्टरांकडे जा.

**कुत्र्यानं चावल्यावर काय करू नये?**

अनेकदा असं आढळून येतं की, कुत्रा चावल्यावर काही लोक साधारण जखम समजून त्यावर हळद, लिंबू किंवा मीठ लावतात. हे करून बॅक्टेरिया मरतील असं त्यांना वाटत असतं. पण या गोष्टींनी त्वचेची जळजळ अधिक वाढू शकते. या गोष्टी करायचं सोडून आधी डॉक्टरांना भेटा.

**कुत्रा चावल्यावर उपचार**

जर एखाद्या व्यक्तीला कुत्रा, माक, मांजर किंवा एखादा प्राणी चावला किंवा त्यांच्याद्वारे हलकं खरचटलंही असेल तर त्यातून रक्त येतही नसेल तरी २४ तासांच्या आत रेबिजचं इंजेक्शन घ्यावं. यात जराही उशीर केला तर जीवाला धोका होऊ शकतो. जर पाळीव कुत्रा चावला असेल आणि त्याचा मालक सांगत असेल की, कुत्र्याला लस दिलेली आहे. तरी सुद्धा डॉक्टरांकडे जाऊन त्यांच्या सल्ल्यानेच तुम्ही रेबिजचं इंजेक्शन घ्यायला हवं. अनेक प्राण्यानं चावल्यावर लोक वेगवेगळ्या गोष्टी करतात, पण आपण कुणाच्याही बोलण्यात न येता सगळ्यात आधी चांगल्या डॉक्टरांना दाखवा आणि योग्य ते उपचार घ्या.

# वर्षा पर्यटनासाठी माथेरानमध्ये गर्दी

**माथेरान : प्रतिनिधी**

पावसाळ्यातील दर शनिवार आणि रविवार ह्या दोन दिवसांत पर्यटकांचा महापूर दिसून येत आहे. वर्षाऋतुमधील ही पर्यटन वारी करण्यासाठी राज्यातील विविध भागांतील पर्यटक मोठया प्रमाणावर हजेरी लावत आहेत. दर शनिवारी मर्यादेपेक्षा अधिक पर्यटक दाखल होत असल्याने अनेकदा घरगुती लॉज मिळणे कठीण होते. त्यामुळे पर्यटकांना नाईलाजाने माघारी जाण्याची वेळ येत असते. त्यामुळे अनेकदा पर्यटक यामध्ये विशेषतः कॉलेज युवक युवतीचे घोळकेच्या घोळके एक दिवसीय पर्यटनासाठी पहाटेपासून दाखल होत असतात.




पावसाळयात माथेरान स्थळाचे निसर्गसौंदर्य अधिक खुलून दिसते. सर्वत्र हिरवीगार वनराई आणि काळे कभिन्न डोंगर न्हाऊन निघाल्यावर त्यावरून पडणारे शुभ्र जलप्रपात मनाला मोहीत करतात. माथेरानमध्ये पावसाळी धबधबे नसल्याने रविवारी येणारे बहुधा सर्वच पर्यटक थेट शारलोट लेक वरील ओसंडून वाहणाऱ्या सुरक्षित पाण्याखाली मनसोक्त भिजण्याचा आनंद घेण्यासाठी येत आहेत.

या दोन दिवसांत छोट्या मोठ्या स्टोल्स धारकांना वडापाव, भजी, चहा, मका कणीस यातून चांगले उत्पन्न मिळते. तर हॉटेल मॅनेजमेंट सह गावातील लॉज धारकांना, रेस्टॉरंट तसेच चिक्की चप्पल व्यावसायिक यांना शुक्रवार आणि शनिवार या दोन दिवसांत उत्तम प्रकारे व्यवसाय प्राप्त होत आहे. मुख्य रहदारीच्या रस्त्यावर चालताना एकप्रकारे जत्रेचे स्वरूप प्राप्त होते.

**आम्ही नेहमीच पावसाळ्यात एकदिवसीय पर्यटनाला सहकुटुंब येतो. खरोखरच माथेरान हे खूपच सुंदर ठिकाण आहे. इथे आलो की मनातील सर्व मलभ दूर होते, नेहमीच्या कामातील शीण केव्हा निघून जातो हे समजत नाही. कमी खर्चातील हे पर्यटनस्थळ पावसाळ्यात नक्कीच पाहण्यासारखे आहे.**

**–आवेश जगताप, पर्यटक, मुंबई**

# थार गाडीचा घाटात अपघात

## चार पर्यटक थोडक्यात बचावले

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या वाहनाला घाट चढत असताना भीषण अपघात घडला. गुजरात राज्याची पासिंग असलेली महेंद्र कंपनीची थार या कारमध्ये चार प्रवाशी प्रवास करीत होते, मात्र ते थोडक्यात बचावले असून किरकोळ जखमी झालेत. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात घडला.



माथेरान घाटातील जुमापट्टी या रेल्वे स्थानकाच्या वरील पहिला क्रॉसिंग रेल्वे ट्रॅक वळणावर हा अपघात घडला. घाट उतरत असलेल्या स्कूटी चालक महिलेला वाचवण्याच्या प्रयत्नांत कारमधील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला असणारी सुरक्षा लोखंडी रेलिंग तोडून थेट कार खड्ड्यात जाऊन अपघातग्रस्त झाली. सुदैवाने यात कुठलीही जीवित हानी झालेली नसली तरी कारचे मोठे नुकसान झाले आहे. कार (जीजे ०१ एमयू २३८९) मधील पर्यटक अहमदाबाद येथून आल्याचे सांगण्यात आले होते. त्यांच्या सोबत आणखी काही मित्र दुसऱ्या कारमध्ये होते. अपघातग्रस्त कार टॉय करून बाहेर काढण्यात आली. त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा दूर झाला आहे.

# रायगड जिल्ह्यात आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम

## सांगडे शाळेत जलसंवर्धन दिंडी

**चौक : प्रतिनिधी**

आषाढी देवशयनी एकादशी निमित्ताने प्राथमिक शाळा सांगडे येथील विद्यार्थी यांनी दिंडी पालखी सोहळा आयोजित करून जलसंवर्धन जनजागृती केली. ग्रामस्थांनी सहभागी होऊन विद्यार्थी यांचे कौतुक केले.

उपक्रम सामाजिक बांधिलकीचा हे ध्येय ठेवून विद्यार्थी यांनी शाळेचे शिक्षक, शाळा समिती व ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून जनजागृती करून जलसंवर्धन काळजी गरज हा उपक्रम राबविला. या वेळी पथनाट्य सदृश दिंडीचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जपली. दिवसभर विद्यार्थ्यांनी जलसंवर्धन करणे किती काळाची गरज आहे हे आपल्या पथनाट्य यातून ठिकठिकाणी वाडीत गावात समजून सांगितले. कार्यक्रमास सरपंच सोनाली भद्रिके, पोलीस पाटील जयेंद्र पाटील, ग्राम पंचायत सदस्य, नागरिक उपस्थित होते.





## हरिकीर्तनात श्रीवर्धनमध्ये भक्तिरसाचा वर्षाव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीचया निमित्ताने श्रीवर्धन तालुक्यात भक्तिरसाचा वर्षाव झाला. मंदिरात हरिकिर्तन, प्रवचन, भजन आणि दिंडी सोहळ्यांनी वातावरण विठ्ठलमय झाले.

शाळांतील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी वारकरी वेषात टाळ–चिपल्या वाजवत, भगव्या पताका घेऊन विठ्ठल! विठ्ठल! गजरात दिंडी काढली. त्यांच्या भक्तिभावाने उपस्थितांचे मन हरखून गेले. अनेकांनी त्यांचे कौतुक करत छायाचित्रे व व्हिडिओ घेतले.

श्रीवर्धन येथील मूळगाव कोळीवाड्यातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात विशेष जाहीर हरिकिर्तन सेवा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात स.भ.प. महेंद्र चौलकर यांनी अतिशय मधुर आणि भावस्पर्शी कीर्तन केले.

कीर्तनात विठोबा–रखुमाईचे जीवनचरित्र, भक्त पुंडलीकाची कथा सांगताना त्यांनी अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्हीं या अभंगाच्या ओळी म्हणत त्याचा अर्थ सोप्या भाषेत स्पष्ट केला. गुरुजींनी सांगितले, विठ्ठलभक्ती केली तर आपला सारा संसार सुखाचा होतो, जीवनात आनंद भरतो. हे ऐकून श्रोते भावविवश झाले आणि विठ्ठलनामाच्या गजरात तल्लीन झाले.

## शिशूमंदिर विद्यालयाची कर्जतमध्ये दिंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

रविवार आणि रिमझिम पाऊस असूनही आषाढी एकादशीच्या निमित्ताने अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या शिशूमंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कर्जत शहरातून उत्साहात दिंडी काढली तसेच महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुध्दा दिंडीचे आयोजन करून आषाढी एकादशी साजरी केली.

प्रत्येक आषाढी व कार्तिकी एकादशीच्या दिवशी विविध शाळांमधील शिक्षकांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थ्यांची दिंडी काढून कर्जत शहरातून कपालेश्वर मंदिरामध्ये नेण्यात येते व तेथे आरत्या व अभंग सादर करुन झाल्यावर ही दिंडी पुन्हा शाळेमध्ये नेण्यात येते. त्यप्रमाणे शिशूमंदिरच्या मुख्याध्यापिका अस्मिता निमकर व विद्या विकास मंदिरच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी काढण्यात आली. कपालेश्वर मंदिरामध्ये पदाधिकाऱ्यांनी दिंडीचे स्वागत केले.




अभिनव प्रबोधिनी ट्रस्टच्या शारदा मंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहिवली येथील पुरातन विठ्ठल मंदिरामध्ये दिंडी नेली होती. तर कडाव गावातही तेथील शिशुमंदिर शाळेची दिंडी गावातून श्री बाल दिगंबर मंदिरामध्ये नेण्यात आली होती.

## शेणवई शाळेत आषाढी एकादशी वारी

**रोहे : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरचे विठू माउलीची दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशी निमित्ताने करोडो वारकऱ्यांचा मेळा चंद्रभागेतीरी भरतो. याच अनुषंगाने भारतीय संस्कृतीच्या जोपासनेसाठी शनिवारी रोहा तालुक्यातील रा.जि.प. शाळा शेणवई येथे आषाढी एकादशी निमित्ताने वारीचे आयोजन करण्यात आले होते.



आषाढी एकादशी असल्याने मुलांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी त्यांना अनुभव घेता यावा यासाठी पालक व मुलांनी पुढाकार घेवून आषाढी एकादशी वारीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी काढलेल्या वारीदरम्यान अनेकांनी पालखीचे दर्शन घेतले. वारीने गावातून एक फेरी पूर्ण केली.

वारी समावेतपालक शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख विजय तुकाराम वेळे, उपशिक्षिका शिल्पा सुर्वे, दया गायकवाड, सारिका गांगड, प्रसाद फड, सरिता देशमुख अंगणवाडीताई रोहिणी देशमुख, भूमिका पिसाट बहुसंख्य माता पालक उपस्थित होते. शेवटी केळी, नारळ साखरेच्या गोड प्रसाद वाटपाने वारीची सांगता करण्यात आली.

## अलिबागेत ज्येष्ठ भजनी कलाकारांचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

मैफिल अलिबाग या संस्थेतर्फे आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथील आरसीएफ कुरूळ वसाहतीमध्ये तीर्थ विठ्ठल या सांगितिक मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आरसीएफचे कार्यकारी संचालक (थळ) नितीन हिरडे यांच्या हस्ते अलिबाग परिसरातील ज्येष्ठ भजनी कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास आरसीएफचे कार्यकारी संचालक (थळ) नितीन हिरडे यांनी पत्नी मिनल हिरडेसह उपस्थिती दर्शवून ज्येष्ठ कलाकारांना सन्मानित केले. या वेळी सुविख्यात हरिश्चंद्रबुवा लोणारकर (वय वर्षे ९६ रा. भाल), रमेश बुवा नाईक, रमेशबुवा खंडागळे, गोपाळबुवा भिडे, शंकरबुवा पाटील, तुळशीदासबुवा पवार, सुरेशबुवा गुरव, गणेशबुवा पडते, विजयबुवा काठे, गजाननबुवा दाते , दामोदर म्हात्रे, श्रीधरबुवा पाटील, रमेश पाटील, यशवंत आठवले या वयोवृद्ध कलाकारांना सन्मानित करण्यात आले.

सन्मान सोहळयानंतर प्रसिद्ध शास्त्रीय संगीत कलाकार सायली तळवलकर आणि नागेश आडगावकर यांच्या 'तीर्थ विठ्ठल' या भक्ती संगीताच्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमास अर्चना हरळीकर, महाव्यवस्थापक सुधीर कोळी व सुजाता कोळी, महाव्यवस्थापक मगेश यांसह संगीतप्रेमी रसिक बहुसंख्येने उपस्थित होते. सन्मानितांच्या वतीने श्रीधरबुवा पाटील यांनी मनोगतामध्ये आरसीएफ व्यवस्थापन व मैफिल अलिबाग प्रति कृतज्ञता व्यक्त केली तर सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन उदय जोशी यांनी केले.




### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामायिक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. शिवाजी केशव पाटील व इतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक श्री. शिवाजी केशव पाटील व इतर यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन मौजेः तळबंदखार (५५३३३८) (PU-ID : 18139652331), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १/१/क खाते क्रमांक : ११४ | १ | ०.११.६० | २.०० |
| | | पो.ख. ०.१२.७० | |
| | | **एकुण ०.२४.३०** | |

**या एकूण विक्री क्षेत्राचे ०.२४.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०६/०७/२०२५**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड –४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१


## विठ्ठल मंदिरात भाविकांचा मेळा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील जुनी पेठ येथील श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल रुक्मिणीची पूजा करण्याकरीता भाविकांनी सकाळ पासुन प्रचंड गर्दी केली होती.



आषाढ एकादशीला प्रातःस्नान करून तुलसी वाहुन विष्णुपुजन करण्यात येते या पुजेचा मान–नरेश दत्तात्रेय भोईर यांना मिळाला. पहाटे महापुजा आरती झाल्यानंतर मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले. पंचक्रोशी भागातील एकमेव मंदिर असल्यामुळे पंचक्रोशी भागातील तेलवडे, वाणदे, जोसरंजण, खारअंबोली व आदी भजने मंडळी येऊन भजन व किर्तन गायली जातात. सकाळ पासूनच मोठी गर्दी या मंदिरात पहावयास मिळाली. हजारोच्या संखेने लोकांनी या मंदिरात येऊन दर्शन घेतले आहे.

श्री काळ भैरव विठ्ठल रुक्मिणी देवस्थानाचे अध्यक्षप्रा. डॉ. विश्वास चव्हाण, उपाध्यक्ष संदिप राजपुरकर, खजिनदार प्रकाश चव्हाण, सचिव संजय नाईक प्रकाश राजुरकर, रूपेश जामकर, प्रसन्न जाळगांवकर, समिर भाटकर, बाळा पोतदार, अनिल भाटकर, मन्या म्हसळकर, मिलिंद चव्हाण, रामकृष्ण राजुरकर, अरुण कोतवाल, किशोर अत्रे कार्यकारणी सदस्य व आदिनी अभक्त परिश्रम करून सुयोग्य व्यवस्थापन ठेवले होते.

## पिंगळसई येथे ज्येष्ठ वारकऱ्यांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

पिंगळसई येथे आयोजित खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ज्येष्ठ वारकऱ्यांचा सन्मान कार्यक्रमात बोलत होत्या. ज्येष्ठ नागरिक, वारकऱ्यांचा यथोचित ना.अदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी व्यासपीठावर माजी आमदार अनिकेत तटकरे, सरचिटणीस विजयराव मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, युवक अध्यक्ष जयवंत मुंढे, समाजसेवक आप्पा देशमुख, माजी सरपंच अनंत देशमुख, गणपत देशमुख व मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविकात माजी सरपंच अनंत देशमुख यांनी तटकरे कुटुंबांचा आणि पिंगळसई गावाचे एक ऋणानुबंधाचे नाते आहे. गावावरील प्रेमाची उतराई नेहमीच होत असते. असेच नाते कायम राहील, असा विश्वास देशमुख यांनी ग्रामस्थांच्या वतीने दिला.

कार्यक्रमाला नारायण देशमुख, बबन देशमुख, विठ्ठल देशमुख, प्रभाकर देशमुख, जनार्दन देशमुख, काशिनाथ देशमुख, बबन पासलकर, चंद्रकांत देशमुख, राम दहिंबेकर, संकेत देशमुख, सतीश मोहिते, नारायण मोहिते भगवान खेडकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच अनंत देशमुख यांचया मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व युवकांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, पिंगळसई ग्रामस्थांचे अनेक वर्षाचे ग्रामपंचायत कार्यालय स्वप्न लवकरच पूर्ण होईल हे अधोरेखित झाले आहे.



## महादेववाडी येथे विठूनामाचा गजर

**रोहे : प्रतिनिधी**

रा.जि.प. आय.एस.ओ. शाळा महादेववाडी येथे महादेवांच्या आशीर्वादाने पावन झालेल्य पवित्र भूमिच्या आवारात अतिशय प्रसन्न अशा वातावरणात, विठूरायाच्या भाक्तीत तल्लीन होवून आषाढी एकादशीनिमित दिंडी उत्सव साजरा करण्यात आला.



पालखी संपूर्ण गावातून विठु नामाचा गजर करून फिरविण्यात आली. त्यात विद्यार्थी, शिक्षक केंद्रप्रमुख पालक ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे सहभाग झाले होते. या उपक्रमात धाटाव केंद्र केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, महादेववाडी शाळा, विदयार्थी, पालक, गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा व सदस्य यांनी सहभाग घेतला. यावेळी उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

केंद्रप्रमुख नारायण गायकर, शिक्षक संतोष तपकिरे, ललित लेंडी, अश्विनी कारभारी, स्मिता घोरपडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तेजस्विनी सुतार, समिधा सुतार, सचिन भगत, समीक्षा सुतार, सलोनी शिंदे, गीता धोत्रे, शिल्पा सुतार, विशाखा भगत, अनिश भौड, प्रदीप सुतार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेल, उरण परिसरातील शाळांमध्ये विठू माऊलीचा गजर

## कळंबोली विद्यालयात बाल वारकऱ्यांची दिंडी



**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली मधील मराठी प्राथमिक विद्यालयातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशात आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येला विठू नामाचा गजर करीत दिंडी काढून सर्वांचेच लक्ष वेधले. या वेळी विठुरायाच्या गजर संपूर्ण विद्यालय परिसरात घुमला. विद्यालयाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजन करून विद्यार्थ्यांना घडवले जात असल्याचे मुख्याध्यापिका वनिता कोळी यांनी सांगितले.

कळंबोली वसाहती मधील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलातील मराठी प्राथमिक विद्यालयज्ञमध्ये शनिवारी आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी दिंडीचे आयोजन केले होते. विठू माऊलीच्या मूर्तीचे पूजन करून विद्यार्थी पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे दर्शन घेतले. आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला विद्यालयामार्फत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेशात भगवी ध्वज फडकवीत व विठू नामाचा गजर करीत दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिंडी सोहळा सु ए सो चे कळंबोली विद्या संकुल प्रमुख प्राचार्य राजेंद्र बाजीराव पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका कल्पना किशोर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली दिंडी सोहळा झाला.

**आषाढी एकादशीच्या पूर्व संधेला विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी काढून संत महंतांची महती रुजली जावी यासाठी विद्यालय विशेष प्रयत्न करत आहे. समाजामधील सर्वांकडून विद्यालयाच्या कामगिरी बाबत भरघोस पाठिंबा दिला जात आहे.**
**–राजेंद्र पालवे, प्राचार्य, सुधागड विद्या संकुल, कळंबोली**

दिंडी सोहळा यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि कळंबोलीतील समाज सेवक नितीन काळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला.

## उरण मुळेखंड शाळेत वारी पंढरीची

**उरण : वार्ताहर**

विठू माऊली तू, माऊली जगाची... माऊलीत मूर्ती विठ्ठलाची या उक्तीप्रमाणे शनिवारी पीएमश्री शाळा मुळेखंड शाळेमध्ये वारी पंढरीची माऊली महाराष्ट्राची या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेतील मुले व मुली वेशभूषा करून वारकऱ्यांच्या रूपात शाळेत आली होती शाळेतील या वारकरी मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन पालखी सजवून विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची गावातून वाजत गाजत वारी काढण्यात आली. या वारीमध्ये नृत्य, रिंगण फुगडी, बस फुगडी, खेळ खेळत वारकरी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी; त्याचप्रमाणे गावातील ग्रामस्थांनी सहभागी होऊन गावातील साई मंदिर व शाळेच्या मैदानात फेर धरून पांडुरंगाचे दर्शन पूर्ण गावाला घडवले.

या उपक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनीषा म्हात्रे, ज्येष्ठ मार्गदर्शिका जयवंती ठाकूर, ओम साई महिला बचत गट, अंगणवाडी ताई, शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर,जेष्ठ मार्गदर्शिका विद्या वाणी, दिशा तांडेल, संजय होळकर, अर्चना पाटील व ग्रामस्थ महिला सहभागी झाले होते. या दिंडीचे आयोजन शाळेचे उपक्रमशील शिक्षक संजय होळकर यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने उत्तम प्रकारे करून संस्कृती जतन करून वारीची परंपरा अबाधित ठेवली आहे.

शेवटी शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर यांनी ही वारी यशस्वी केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती पालक ग्रामस्थ शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक करून धन्यवाद दिले.



## आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

म. ए. सो. आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल, इंग्रजी माध्यम, माध्यमिक विभाग यांनी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात आणि भक्तीने साजरी केली. या शुभ दिवसाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या अनेक कार्यक्रमांनी हा कार्यक्रम साजरा केला.


या उत्सवाची सुरुवात प्रार्थना आणि आरतीने झाली, ज्यामुळे कार्यक्रमाला आध्यात्मिक रंग चढला. अनया करंदीकर यांनी आषाढी एकादशीच्या महत्त्वाबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी सांगितली. वैभवी मराळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

प्रमुख पाहुण्या युवा कीर्तनकार वर्षा सहस्त्रबुद्धे यांनी संत तुकाराम महाराजांच्या भक्ती आणि साधी राहणीवर प्रकाश टाकत प्रेरणादायी भाषण केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना सांस्कृतिक मूल्ये जपण्यास आणि श्रद्धा, भक्ती आणि सेवेच्या मार्गासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले.

नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे' या अंतर्गत प्रकल्प सादर केला, ज्यामध्ये शाळेच्या परिसरात वनस्पती जीवन आणि पर्यावरण संवर्धनाबद्दलचे त्यांचे निरीक्षण सादर केले गेले. मुख्याध्यापिका मनीषा महाजन यांच्या आभार मानले.



**उलवे : पीएम आवास अनंता सोसायटी बामणडोंगरी येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडी व पालखी सोहळा सेक्टर ६चे अध्यक्ष अजय हेगडकर व उपाध्यक्ष हितेश शिंगरे यांनी आयोजित केला होता. भाजप विभाग अध्यक्ष तथा वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांनी नियोजन व मार्गदर्शन केले. सोहळ्यात ४३ टॉवर रहिवासी सहभागी झाले होते.**




**पनवेल : येथील व्ही.के. हायस्कूलचे कला शिक्षक तसेच सिंधुदुर्ग रहिवासी संघाचे सदस्य रंगनाथ नेरूरकर यांनी आषाढी एकादशीनिमित्त १.५ सेंटीमीटर आकाराच्या सुपारीवर श्री विठ्ठलाची सुंदर अशी प्रतिमा साकारली आहे. ही प्रतिमा साकारण्यासाठी त्यांना साडेतीन तास इतका वेळ लागला. त्यांची ही कलाकृती त्यांनी श्री पांडुरंग चरणी अर्पण केली आहे. त्यांचा या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.**

## रिटघर विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे शनिवारी (दि.५) आषाढी एकादशी व वृक्षदिंडी कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. या वेळी विठ्ठल रुक्मिणी ची वेशभूषा विद्यार्थ्यांनी केली होती. इतर विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा (नऊवारी, सदरा पायजमा) केली होती.

इयत्ता पाचवी ते दहावी अखेर च्या सर्व विद्यार्थ्यांची वृक्षदिंडी रिटघर गावात काढण्यात आली. या दिंडीत वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांनी रिटघर गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भजन व आरती पेटी, तबल्यावर सादर केली. प्रल्हाद गुलाब भोपी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

विद्यालयात विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.बी. कारंडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले. यानंतर सांस्कृतिक विभाग प्रमुख खुटले मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भजन व आरती केली व कार्यक्रमाची सांगता झाली.



## पनवेल मनपा शाळांमध्ये वृक्षदिंडी आणि ग्रंथदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मनपा शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येतात. आषाढी एकादशीचे औचित्य साधून पनवेल महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये शनिवारी वृक्ष दिंडी व ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले.



या दिंडीमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची संस्कृती जपणारा वारकरी पेहराव परिधान केला होता. या वेळी विठुरायाचे अभंग, ओव्या, फुगडी याबरोबरच वृक्ष संवर्धन व पुस्तकांचे महत्व यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. विद्यार्थ्यांसोबत, शिक्षक व पालकांनीही या दिंडीत सहभाग घेतला होता.

अशा आगळ्यावेगळ्या दिंडीचे पनवेल नगरीत आयोजन केल्याबद्दल पनवेल मनपाचे उपायुक्त प्रसनजित कारलेकर व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी समाधान व्यक्त करून सर्वांचे कौतुक केले.

## खोपटे येथे वारी पंढरीची

**उरण : वार्ताहर**

आषाढी एकादशी निमित्त राजिप, शाळा खोपटे येथे शनिवारी वारी पंढरीची उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम राजिप, शाळा खोपटे व माध्यमिक विद्यालय भाग शाळा खोपटे या दोन्ही शाळेच्या वतीने पंढरीची वारी हा कार्यक्रम घेण्यात आला. पंढरी, पंढरी..., विठूरायाची नागरी या गाण्यावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या वेळी माध्यमिक विद्यालय शाळा खोपटे चेअरमन राजन पाटील, मुख्यध्यापिका साधना पाटील, शिक्षक वर्ग राजिप प्राथमिक शाळा खोपटे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष देविदास ठाकूर, मुख्याध्यापक महेंद्र गोंधळी व शिक्षक वर्ग, पालक वर्ग, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.



## विठू माऊलीच्या जयघोषासह स्वच्छतेचाही जागर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून स्वच्छतेचा जागर करण्यात येत असून त्यासोबतच 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेतून आरोग्य जपणुकीचा संदेशही प्रसारित करण्यात येत आहे.



याच अनुषंगाने आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर करावे येथील ज्ञानदीप सेवा मंडळाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या सहयोगाने स्वच्छता दिंडी सोहळ्याचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले. ६०० हून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षक, नागरिक यांच्या सहभागाने हा दिंडी सोहळा लक्षणीय झाला.

आषाढी एकादशी असून सर्व वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघालेले असताना लहान मुलांना वारीचे महत्व कळावे व दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून त्यांच्या मनात आपल्या संस्कृतीची रूजवात व्हावी तसेच स्वच्छता संदेशाचाही प्रसार व्हावा यादृष्टीने आज महानगरपालिकेमार्फत ज्ञानदीप सेवा मंडळाच्या सहकार्याने स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून स्वच्छता आणि प्लास्टिक प्रतिबंधाचा संदेश घराघरात पोहचेल व उद्याचे शहराचे भविष्य असणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नवी मुंबई एक आदर्श शहर म्हणून पुढे येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शाळेतील विद्यार्थी – विद्यार्थिनी वारकरी वेशात ज्या उत्साहाने या स्वच्छता दिंडी सोहळ्यात सहभागी झाले त्याचे विशेष कौतुक त्यांनी केले.

## बेलपाडा विद्यालयातील विद्यार्थ्यांना छत्रीवाटप



**उरण : बातमीदार**

कै. बायमा नामदेव शेठ पाटील यांच्या स्मरणार्थ कामगार नेते तथा सामाजिक कार्यकर्ते मधुकर पाटील यांच्यातर्फे रा. जि. प. शाळा बेलपाडा येथील विद्यार्थ्यांना छत्री वाटपचा कार्यक्रम मोठया उत्साहात झाला.

मधुकर पाटील यांनी आजपर्यंत अनेक गोर गरिबांना सढळ हाताने, निस्वार्थीपणाने मदत केली आहे. कै. बायमा नामदेव शेठ पाटील यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना छत्री वाटप करून त्यांनी सर्वांचा आनंद द्विगुणित केला आहे.

या कार्यक्रमावेळी भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री, राष्ट्रीय खजिनदार सुधीर घरत, रायगड जिल्हा संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना सचिव अतिश पाटील, माजी सरपंच तुकाराम ठाकूर, ग्राम सुधारणा मंडळ बेलपाडाचे सचिव कर्णिक पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कडू, अरुण घरत, अशोक घरत, संतोष भ. म्हात्रे आदी उपस्थित होते.

## वह्यावाटप



**उरण : जिल्हा परिषद शाळा वेश्वी येथे श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला. त्यासाठी शाळेतील शिक्षकवर्ग तसेच माजी उपसरपंच प्रमिला महेंद्र मुंबईकर, महेंद्र श्रीपत मुंबईकर, कामगार नेते विनायक मुंबईकर, सुहास राजाराम मुंबईकर, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# कोळी बांधवांना रापणचा आधार

## पावसाळ्यात उदरनिर्वाहासाठी सामूहिकपणे मासेमारी

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

सततचा वादळी पाऊस, हवामानात होणारे अचानक बदल आणि एलईडी, पर्ससनेट बोटींची अनधिकृत मासेमारी यामुळे स्थानिक कोळी बांधवांना खोल समुद्रात जाऊनदेखील मासे मिळत नसल्याने रित्या हातीच परतावे लागत असे. शिवाय शासनातर्फे १ मे ते ३१ जुलैपर्यंत मासेमारीवर बंदी घालण्यात आली आहे. संपूर्ण कुटुंबाची उपजीविका करायची म्हटल्यावर किनाऱ्यावर रापण मासेमारी कोळी बांधवांना आधार ठरू पाहत आह.

रापणीचे जाळे मोठे असते. ते पाण्याचा मोठा भाग व्यापते. त्या जाळ्याला दोन्ही बाजूंना पन्नास ते साठ वाव जाड काथ्याचा दोरखंड, पन्नास ते साठ पाटे जोडून पंधरा फूट उंची राखली जाते. मधील घोळाच्या भागाला पाटे मजबूत लावले जातात. जाळ्याच्या सुरुवातीला व दोरखंडाच्या शेवटी पंधरा फूट उंचीचा मजबूत उंचीचा दांडका लावलेला असतो. रापण ओढणे हे येरागबाळ्याचे काम नाही. त्याला दमदार व भक्कमपणे खेचावे लागते.



दोरखंड माणसांकडून त्यांचे पाय मातीत, वाळूत खोलवर रोवून ओढला जातो. ती माणसे फार श्रमाचे काम करतात. जाळे किनारी आल्यावर जाळ्यात मासे घावले नाही, तर पुन्हा हा कष्टाचा खेळ सुरू राहतो. मासे पूर्णतः किनाऱ्यावर घेतल्यानंतर ज्यांना मासे विकत घ्यायचे असतात ती मंडळी पुढे सरसावत व पैसे देऊन मासे खरेदी करतात. शिल्लक राहिलेल्या माशांची सर्वांमध्ये वाटणी होते.

अशा प्रकारे पहाटे चार-पाच वाजेपासून सुरू झालेले रापण दुपारी २ वाजेपर्यंत सुरु राहते. रापण केल्यावर सध्या मोठ्या प्रमाणात फिलसा ही मासळी मोठ्या प्रमाणात मिळत आहे. मासळी मार्केटमध्ये हा मासासुद्धा चढ्या किमतीत विकला जात आहे. दोन ते तीन किलो वजनाचा मासा किमान ८०० रुपयांचा विकला जात आहे.

एक जाळीला पकडण्यासाठी १५ ते २० तरुण मच्छीमार बांधव लागतात. दुपारपर्यंत रापण करून जे मासे मिळतात ते विकून आपला वाटा घेऊन घरी यायचे असा दिनक्रम या दोन महिन्यांत सुरू राहणार आहे.

दोन महिन्याच्या कालावधीत समुद्र किनारी मच्छीमारांना रापणचा एकमेव आधार उपलब्ध होत असून कुटुंबातील लोकांना थोडा आर्थिक भार सहन करण्याची मदत होत आहे.

# कर्जत टेम्पो अपघातात पतीनंतर पत्नीचाही मृत्यू

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

मोटरसायकलवर निघालेल्या दाम्पत्याचा कर्जत-कल्याण राज्यमार्गावर शुक्रवार ४ जुलै रोजी दुपारी भीषण अपघात घडला होता. या अपघातात असालपाडा गावातील राहणारे ५२ वर्षीय एकनाथ बबन शेंडे आणि पत्नी जयश्री एकनाथ शेंडे हे दाम्पत्य जबर जखमी झाले होते. या दाम्पत्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी पती एकनाथ शेंडे यांना मृत घोषित केले होते, तर रात्री उशिरा पत्नी जयश्री एकनाथ शेंडे या महिलेचाही उपचार घेत असताना मृत्यू झाला.



एकनाथ बबन शेंडे आणि पत्नी जयश्री एकनाथ शेंडे हे दाम्पत्य बाजार खरेदीसाठी म्हणून आपल्या बेकरेजवळील असलपाडा या गावातून नेरळ येथे मोटरसायकलवर निघाले होते. या वेळी कर्जत दिशेकडून नेरळ दिशेने भरधाव निघालेल्या आयशर टेम्पोने राज्यमार्गावरील आंबिवली परिसरात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास मोटरसायकला धडक दिली.

मोटरसायकल टेम्पोच्या पुढच्या चाकाखाली गेल्याने दांपत्य जबर जखमी झाले होते. रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडलेल्या या दाम्पत्याला २५ मिनिटे मदतच मिळाली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली. या वेळी टेम्पोचालकदेखील आपले वाहन सोडून घटनास्थळाहून फरार झाला होता. अखेर पतीनंतर पत्नीचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# एक्स्प्रेसमधून उडालेली फळी लागून तरुणाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत येथून मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकलमधील एका तरुणाचा ट्रॅकवर कोसळून अपघाती मृत्यू झाला. ही घटना रात्री सव्वा आठच्या सुमारास घडली. विरुद्ध दिशेने जाणाऱ्या एक्स्प्रेसमधून एक लाकडी फळी उडून शेजारून जाणाऱ्या लोकलमधील तरुणाला लागली आणि त्याचा बळी गेला. चंद्रकांत जाधव असे या मृताचे नाव असून अन्य दोन प्रवासीदेखील यामध्ये जखमी झाले आहेत.

वांगणी पाषाणे येथील हिमालय इमारतीत राहणारे चंद्रकांत जाधव हे नेहमीप्रमाणे मुंबईकडे कामाला निघाले होते. दरम्यान, कर्जतहून मुंबईकडे निघालेल्या ट्रेनमध्ये वांगणी रेल्वेस्थानकात ते बसून पुढील प्रवास करीत होते. ट्रेन वांगणी



गोरेगाव या परिसरात आली असता याच वेळी मुंबईहून कर्जतच्या दिशेने जाणाऱ्या एक्स्प्रेसमधील एक फळीचा तुकडा उडाला आणि तो दरवाज्यात उभ्या असलेल्या चंद्रकांत जाधव यांना अत्यंत जोरात लागला. या तडाख्याने दारात उभा असलेले जाधव ट्रॅकवर कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. ट्रेनमधील अन्य दोन प्रवासीदेखील जखमी झाले. सामाजिक कार्यकर्ते सचिन म्हसकर यांनी रेल्वे विभागाकडून मयत कुटुंबाला मदत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# श्री गणपती संस्थान महडतर्फे विद्यार्थ्यांना रेनकोट, छत्रीवाटप

**मोहोपाडा, खोपोली : प्रतिनिधी**

श्री गणपती संस्थान महड यांच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. सामाजिक बांधिलकी जपत या संस्थांनाकडून गावातील विद्यार्थ्यांना छत्री आणि रेनकोटचे वाटप मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मंदिराच्या सभामंडपात करण्यात आले.

या कार्यक्रमास खालापूरच्या नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, महड देवस्थानच्या विश्वस्त मोहिनी वैद्य, खालापूर पोलीस ठाण्याचे पीएसआय अमोल जगताप, नगरसेविका श्वेता गुरव, सुनीता पाटील, मीनल कबळे, महड देवस्थानचे पदाधिकारी व शालेय विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देवस्थानच्या विश्वस्त मोहिनी वैद्य, व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांचे आभार मानले.



# भाजप नेते सनी यादव यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष सनी यादव हे दरवर्षी पालकांचे हात हलके व्हावे आणि त्यातून पालकांची विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या शाळेकडील ओढ वाढावी यासाठी शैक्षणिक साहित्य किंवा अन्य साहित्य वाटप करीत असतात.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भारतीय जनता पक्ष खालापूर आणि रोहित कडव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानातून खालापूर तालुक्यातील तुरमाल येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील सत्तरहुन अधिक विध्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



विज्ञानाच्या युगात पालकांची मुलांच्या शिक्षणाप्रति ओढ वाढू लागली आहे, मात्र ही ओढ इंग्रजी शाळांसाठी वाढली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांवर याचा परिणाम होऊ लागला असून मोठ्या संखेने जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होऊ लागली आहे. अशातच या शाळा टीकल्या पाहिजेत आणि विध्यार्थी संख्या वाढली पाहिजे या दृष्टिकोनातून कित्येक वर्षे खालापूर तालुक्यातील युवा नेतृत्व आणि भाजप तालुकाध्यक्ष सनी यादव हे नेहमीच प्रयत्नशील असतात. शिक्षणाप्रति असलेली त्यांची ओढ पाहता अनेक सहकारी त्यांना या कार्यात जोडले गेले आहेत.

युवा मोर्चा विधानसभा अध्यक्ष प्रसाद पाटील यांच्या उपस्थितीत शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना विध्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच आनंद दिसत होते.

या वेळी उपस्थित विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाजप तालुका अध्यक्ष सनी यादव यांनी आपले विचार मांडत, ज्या समाजात आपण जन्म घेतो त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो. या सामाजिक बांधिलकीतून गेल्या अनेक वर्षापासून मी शैक्षणिक क्षेत्रात काम करत असून यापुढेही कोणताही स्वार्थ न पाहता निस्वार्थीपणे या क्षेत्रात काम करत गोरगरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात देइन. मी केलेले हे कार्य मोठे नाही, परंतु माझ्या गोर गरीब बांधवांचे हात हलके झाले तर त्यांना आपला कुटुंबाचा गाडा चालविण्यासाठी काही प्रमाणात सोपे जाईल आणि त्यातूनच जिल्हा परिषदेच्या शाळेतील विध्यार्थी संख्या वाढेल, जेणेकरून या शाळा बंद होणार नाहीत. याच जिल्हा परिषदेच्या शाळेमधून आम्ही शिक्षण घेतले आहे. त्या शाळेचे काही प्रमाणात ऋण फेडण्यासाठी मी आणि माझे सहकारी हे कार्य करीत आहोत, असे मत मांडत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास उपाध्यक्ष विकास रसाळ, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रसाद देशमुख, बीड खुर्द ग्रामपंचायत सदस्य लवेश कर्णूक, मयूर पाटील, निलेश साळुंखे, आकाश मुसळे, कुणाल शिंदे, प्रणित साळुंखे, निलेश साळुंखे, विशाल कडव, सुजल नलावडे, सूरज नलावडे, दर्शन यादव, मुख्याध्यापक सुजित पांगारे, शिक्षक संजय जाधव आदी उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त ताकई येथील विठ्ठल मंदिरात भाविकांची मांदियाळी



**खोपोली : प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या खालापूर तालुक्यातील ताकई येथील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठल रखुमाई मंदिरात आषाढी एकादशी निमित्ताने दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी पहावयास मिळाली. पहाटेपासूनच भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

खोपोलीचे माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या हस्ते या वेळी महापूजा झाली. पहाटे चार वाजता महापुजेला सुरुवात झाली. शेंडे यांनी सपत्नीक ही महापूजा भक्तीभावाने केली.

दरम्यान महापूजेनंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. मंदिर देवस्थान कमिटीकडूनही आलेल्या भाविकांना दर्शन घेताना कोणताही त्रास होऊ नये यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या गेल्या होत्या.

पोलीस अधिकारी तैनात होते, तर कोणत्याही भाविकाला आरोग्यविषयी समस्या आली तर डॉक्टर आणि ॲम्ब्युलन्स व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे रांगेत दर्शन घेताना कायमस्वरूपी पर्लिंग लावण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या भक्तीभावाने आलेले भाविक प्रसन्नपणे दर्शन घेताना दिसत होते. अनेकांना आषाढी एकादशी निमित्ताने दर्शनासाठी पंढरपूर येथे जाता येत नाही असे भाविक मोठ्या संखेने येथे येत असल्याने मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता. सायंकाळपर्यंत वेगवेगळ्या भागातून भाविकांच्या दिंड्या मंदिराकडे येत होत्या. सर्वत्र भक्तिमय वातावरण पहावयास मिळाले.

कार्तिक एकादशीला याच ठिकाणी पंधरा दिवस यात्रा भरत असते. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या मंदिराला खूपच महत्त्व आहे, अष्टविनायक यात्रा करणारे भाविकांचे पावलेही या मंदिराकडे वळतात. ताकई ग्रामस्थांकडे या मंदिराचे व्यवस्थापन आहे.

# श्रीवर्धन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंची वाढवा

**श्रीवर्धन : बातमीदार**

या वर्षी पावसाळयात उधाणाच्या पाण्याने सर्वोच्च पातळी गाठल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी बंधाऱ्यावरून वेगवान प्रमाणात पाणी उलटून किनारपट्टीतील भागात घुसलेले पहायला मिळाले.

२०१४ साली श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभीकरण केलेला सुंदर असा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला होता. राज्याचे तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांच्या प्रयत्नाने हे काम करण्यात आले होते. या बंधाऱ्यावरील समुद्राकडच्या बाजूला मोठ मोठे दगड टाकण्यात आलेले आहेत, जेणेकरून लाटांचे पाणी बंधाऱ्यावरून पलीकडच्या भागांमध्ये येऊ शकणार नाही.



बंधाऱ्यावर गणेश विसर्जनासाठी बांधण्यात आलेले रॅम पूर्ण पुणे नादुरुस्त होऊन तुटून गेल्याचे दृश्य पहायला मिळत आहे तसेच त्या ठिकाणी असलेल्या पायऱ्या या पर्यटकांना व नागरिकांना समुद्राकडे उतरण्यासाठी बनवण्यात आल्या होत्या. पावसाळ्याअगोदर त्यांचेदेखील डागबुजीचे काम करण्यात आले होते, पण उधाणाच्या पाण्याचा मारा एवढा जबरदस्त होता की, जोरदार लाटांच्या तडाख्यामुळे पायऱ्यांवरच्या लाद्या उखडून गेल्या आहेत, तर अनेक लाद्या तुटून बाजूला खच पडला आहे.

ज्या वेळेला धूप बंदी प्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले त्यावेळेला गणेश विसर्जनासाठी बांधलेले रॅम अपूर्ण पडू लागल्यामुळे त्यानंतर त्यामध्ये सुधारणा करून नवीन त्याला पुढे वाढीव रॅम बनवण्यात आले होते, परंतु त्यांच्या खाली योग्य प्रकारे दगडांचा भरणा केलेला नसल्यामुळे यावेळी उधाणाच्या पाण्यामुळे वाढीव बांधलेल्या रॅम्पच्या खालील वाळू निघून गेल्याने त्या ठिकाणी वरचेवर असलेले दगड वाळूत बसले व रॅम तुटून गेला आहे. स्लॅबचेदेखील दोन तुकडे झालेले त्या ठिकाणी पहायला मिळतात.

जागतिक तापमानात सतत होणाऱ्या वाढीमुळे दिवसेंदिवस समुद्राच्या पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होत राहणार आहे. त्यामुळे किनारपट्टीच्या भागातील गावांना त्याचा तडाखा बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भविष्यात श्रीवर्धन येथे पर्यटकांच्या दृष्टीने जर का पुन्हा बंधाऱ्याचे सुशोभीकरण करण्यात आले, तर त्याची उंची तीन ते चार फूट वाढवण्याशिवाय प्रशासनापुढे पर्याय उरणार नाही. या वर्षी श्रीवर्धन तालुक्यात मे महिन्यामध्ये जोरदार पर्जन्यवृष्टी झाली होती, परंतु त्यानंतर जून महिन्यापासून आजपर्यंत पर्जन्यमानाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. या ठिकाणी फक्त सोसाट्याचे वारे असून येणारे मान्सूनचे सर्व ढग वाऱ्यामुळे पुढे जात आहेत व त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रात व देशात पाऊस पडत आहे, परंतु कोकण किनारपट्टीच्या भागांमध्ये पावसाचे प्रमाण यंदा म्हणावे तसे दिसत नाही.

# शेताच्या बांधावर शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा



## कर्जतचे कोंडीराम धुळे आणि रवींद्र जाधव सन्मानित

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लबचा उपक्रम असलेला 'शेताच्या बांधावर शेतकऱ्यांचा सन्मान' हा सोहळा कर्जत प्रेस क्लबच्या वतीने तालुक्यातील जिते आणि चोरावळे या गावात झाला. या वेळी जिते गावाचे शेतकरी रवींद्र किसन जाधव आणि चोरावळे गावाचे शेतकरी कोंडीराम परशुराम धुळे यांचा शेताच्या बांधावर जाऊन सपत्नीक कृषी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

गेल्या सोळा वर्षांपासून पत्रकारांच्या वतीने शेतकऱ्यांचा सन्मान केला जातो. कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विभागीय सचिव ॲड. राहुल देशमुख यांनी प्रेस कलबच्या कार्याची माहिती सांगितली. सहाय्यक कृषि अधिकारी सतिश सपकाळ, कळंब विभागाचे अधिकारी अनिल रुपनवर यांनी कृषी विभागाच्या विविध योजनाची माहिती दिली. त्यानंतर शेताच्या बांधावर जाऊन रायगड प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष संजय मोहिते आणि कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार यांच्या हस्ते शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी सभापती एकनाथ धुळे, माजी उपसभापती अरविंद पाटील, दशरथ जाधव आदी उपस्थित होते. ॲड. रंजना धुळे आणि अरविंद पाटील यांनी कोंडीराम धुळे यांनी मार्गदर्शन केले विजय मांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. दर्वेश पालकर यांनी सूत्रसंचालन केले, तर अजय गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमास अनिल गवळे, संजय अभंगे, जयवंत हाबळे, आनंद सपकाळ, मोतीराम पादिर, गणेश मते, दीपक पाटील, ज्ञानेश्वर बागडे, विपुल माळी, गोरख शेप यांच्यासह अलका जाधव, सुनीता धुळे, संजय कराळे, संतोष धुळे, संजीवनी धुळे, साधना माळी, दीपिका धुळे, अर्जुन धुळे, सखराम दळवी, वाळकु माळी, विलास दळवी, सचिन धुळे, मंगेश माळी, संदीप धुळे, कल्पेश राणे, कल्पेश खडे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होऊन स्वतःसह समाजाचे नाव उज्वल करावे -भीमराव आंबेडकर

**पेण : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात विविध ठिकाणी महाविद्यालयांची निर्मिती केली असून पूर्वीचा वंचित असणारा आपला समाज आता प्रगतिपथावर येत असताना विद्यार्थ्यांनी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होऊन आपल्यासह समाजाचे नाव उज्वल करावे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आणि भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी पेण येथे केले.

भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी पेण तालुका यांच्या वतीने माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ महात्मा गांधी वाचनालय सभागृहात करण्यात आला. त्या वेळी आंबेडकर बोलत होते.



कार्यक्रमाला संस्थेचे राष्ट्रीय सचिव भिकाजी कांबळे, प्रदेश कोषाध्यक्ष प्रशांत गडकरी, वंचित जिल्हाध्यक्ष दीपक गायकवाड, पेण तालुकाध्यक्ष सुनील धामणकर, बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, सुशिल वाघमारे, प्रकाश सोनावणे, संतोष जाधव, किशोर वाघमारे, मंगेश कांबळे आदींसह महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच ज्येष्ठ बौद्धाचार्य, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भीमराव आंबेडकर यांनी पुढे बोलताना सांगितले की, रायगड हा क्रांतीचा जिल्हा आहे. येथे आंबेडकरी चळवळीचे काम चांगले आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेतसुद्धा तितकेच महत्त्व दिले पाहिजे. येणाऱ्या काळात संघटन अधिक मजबूत करून बौद्ध महासभा आणि वंचित एक दिलाने काम करतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

संस्थेचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे आणि वंचितचे तालुकाध्यक्ष सुनील धामणकर यांचे काम अतिशय वाखण्याजोगी आहे हाच आदर्श जिल्ह्याने घ्यावा, असे आवाहन संस्थेचे राष्ट्रीय सचिव भिकाजी कांबळे यांनी केले आहे.

तालुक्यातील दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे आता आमची जबाबदारी वाढली असून येणाऱ्या काळात अशीच संधी विद्यार्थ्यांनी आम्हाला वारंवार द्यावी, असे वक्तव्य वंचितचे तालुकाध्यक्ष सुनील धामणकर यांनी केले.

या वेळी तालुक्यातील असंख्य गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध सामाजिक कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला, तर या कार्यक्रमाच्या निमित्ताने पेणमध्ये आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू भीमराव आंबेडकर यांचे शहरासह तालुक्याच्या विविध गावांमधून आलेल्या समाज बांधवांकडून स्वागत करण्यात आले.

## विम्बल्डनमध्ये जोकोविचचा जलवा

# विजयांचे शतक



**विम्बल्डन : वृत्तसंस्था**

टेनिस जगतातील दिग्गज आणि जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानी असलेल्या सर्बियाच्या नोवाक जोकोविचने यंदाच्या विम्बल्डन स्पर्धेत आपला शानदार फॉर्म कायम ठेवला आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मोठी कामगिरी नोंदवताना विम्बल्डनच्या इतिहासात १०० विजय मिळवणारा केवळ तिसरा पुरुष खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे.

विम्बल्डन स्पर्धेत ३८ वर्षीय सर्बियन दिग्गज खेळाडू नोवाक जोकोविच उत्कृष्ट लयीत दिसत आहे. तिसऱ्या फेरीच्या सामन्यात जोकोविचने आपलाच देशबांधव मिओमिर केकमानोविचचा सरळ सेटमध्ये पराभव केला. या विजयासह तो विम्बल्डनमध्ये १०० सामने जिंकणाऱ्या खेळाडूंच्या प्रतिष्ठित यादीत दाखल झाला आहे.

नोवाक जोकोविचने विम्बल्डनच्या तिसऱ्या फेरीत मिओमिर केकमानोविचविरुद्धचा सामना ६-३, ६-०, ६-४ असा सहज जिंकून पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले. विम्बल्डनच्या इतिहासात जोकोविचपूर्वी केवळ दोन खेळाडूंनी १००पेक्षा जास्त एकेरी सामने जिंकले आहेत. नऊ वेळा विम्बल्डन विजेती ठरलेल्या मार्टिना नवरातिलोव्हा यांनी १२० सामने, तर आठ वेळा चॅम्पियन ठरलेल्या रॉजर फेडररने १०५ एकेरी सामने जिंकले आहेत. आता या दिग्गजांच्या पंक्तीत जोकोविचचाही समावेश झाला आहे.

जोकोविचने २४ ग्रँड स्लॅम विजेतेपदांपैकी सात विजेतेपदे ऑल इंग्लंड क्लबमध्येच पटकावली. गेल्या आठ वर्षांपासून विम्बल्डनमध्ये त्याचे निर्विवाद वर्चस्व राहिले असून या काळात त्याला केवळ कार्लोस अल्कारेझकडून पराभव पत्करावा लागला आहे.



## ऋषभ पंतने केला षटकारांचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत ऋषभ पंत जबरदस्त फॉर्मात दिसत आहे. पंतने पहिल्या कसोटी सामन्यात दोन शतके ठोकली होती, तर दुसऱ्या कसोटी सामन्यात त्याने अर्धशतक केले. या खेळीत त्याने आठ चौकार आणि तीन षटकार लगावले. याचबरोबर त्याने षटकारांचा महाविक्रम नोंदवला आहे.

आता पंत परदेशी भूमीवर कसोटी सामन्यांत सर्वाधिक षटकार ठोकणारा खेळाडू बनला आहे. त्याने बेन स्टोक्स आणि मॅथ्यू हेडनसारख्या दिग्गजांनाही मागे टाकले. पंतने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावात केवळ ५८ चेंडूत ६५ धावा ठोकल्या. या डावात पंतने आठ चौकार आणि तीन षटकार ठोकले. यासह पंतने आतापर्यंत इंग्लंडमध्ये २४ षटकार ठोकले आहेत. हे परदेशी भूमीवर कोणत्याही फलंदाजाने ठोकलेले सर्वाधिक षटकार आहेत. पंतने या काळात स्टोक्सचा विक्रम मोडला. स्टोक्सने दक्षिण आफ्रिकेत २१ षटकार मारले आहेत, तर मॅथ्यू हेडनने भारतात १९ षटकार ठोकले आहेत.

## नीरज चोप्राला घरच्या मैदानावर सुवर्णपदक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दोन वेळचा ऑलिम्पिक चॅम्पियन अन् भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा याने घरच्या मैदानात रंगलेल्या आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेत गोल्डन कामगिरी करून दाखवली. बंगळुरूमध्ये झालेल्या एनसी क्लासिक स्पर्धेत ८६.१८ मीटर थ्रोसह नीरजने सुवर्णपदक पटकावले.

केनियाचा ज्युलियस येगो याने ८४.५१ मीटर थ्रोसह रौप्य, तर श्रीलंकेच्या रुमेश पथिरेज याने ८४.३४ मीटर थ्रोसह कांस्यपदकावर नाव कोरले. एनसी क्लासिक २०२५ म्हणजे नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धा. भारतातील ही पहिलीच आंतरराष्ट्रीय दर्जाची भालाफेक स्पर्धा आहे. बंगळुरूच्या कांतेरावा स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेत देश-विदेशातील अनेक खेळाडूंनी सहभाग घेतला.

नीरज चोप्राची या स्पर्धेतील सुरुवातही फाउल थ्रोसह झाली. दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ८२.९९ मीटर आणि तिसऱ्या प्रयत्नात ८६.१८ मीटर थ्रो टाकला. त्याची ही कामगिरी त्याला सुवर्णपदक पक्के करण्यासाठी उपयुक्त ठरली. या स्पर्धेतील जेतेपदासह भारतातील भालाफेक स्पर्धेतील पहिल्या वहिल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजेता ठरणारा तो पहिला भारतीय खेळाडूही ठरला आहे.



## वैभव सूर्यवंशीचा आणखी एक झंझावात; अंडर-१९ क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक

**लंडन : वृत्तसंस्था**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीनं इंग्लंड दौऱ्यातील चौथ्या वनडेत अंडर १९ क्रिकेटमधील सर्वात जलद शतकी खेळी करत नवा इतिहास रचला आहे. वॉर्सेस्टरच्या मैदानात इंग्लंड अंडर-१९ संघाविरुद्ध भारत अंडर-१९ संघाच्या डावाची सुरुवात करताना वैभवने १२ वर्षांपूर्वीच्या विक्रमाला सुरुंग लावला. त्याने पाकिस्तानच्या फलंदाजाचा विक्रम मोडीत काढला.



भारतीय अंडर १९ संघाकडून खेळताना वैभव सूर्यवंशी याने इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या वनडेत ५२ चेंडूत शतक झळकावले. याआधी अंडर-१९ मधील सर्वात जलद शतकी खेळीचा रेकॉर्ड हा पाकिस्तानच्या कामराम गुलामच्या नावे होता. त्याने ५३ चेंडूत शतक ठोकले होते. वैभवने आपल्या वादळी खेळीत १० चौकार आणि सात षटकार मारल्याचे पहायला मिळाले. या खेळीसह अंडर-१९मधील सर्वात जलद शतकी खेळीचा विक्रम आता भारतीय युवा बॅटरच्या नावे झाला आहे. वैभवने चौथ्या वनडे सामन्यात ७८ चेंडूत १३ चौकार आणि १० षटकाराच्या मदतीने १४३ धावांची खेळी केली.

मागील वर्षी वैभवने चेन्नईच्या मैदानात ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाविरुद्ध मेन्स यूथ टेस्टमध्ये दुसरे सर्वात जलद शतक झळकवण्याचा पराक्रम केला होता. कसोटीत त्याच्या नावे ५६ चेंडूत शतक झळकवल्याचा रेकॉर्ड आहे. अंडर १९ कसोटीत सर्वात जलद शतक झळकवण्याचा रेकॉर्ड हा इंग्लंडच्या मोईन अलीच्या नावे आहे. त्याने २००५मध्ये ५६ चेंडूत शतक झळकावले होते.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com